बरोबर घेऊन माळव्याकडे कुच केला. याही मुलुकगिरींत दादासाहेब यांजबरोबर पन्नास साठ हजार मराठी फौज होती. हें लष्कर प्रथम उज्जनीस गेल्यावर दादासाहेब याच्या मनांत आलें कीं, विठ्ठल शिवदेव यांनीं दोन वर्षांपूर्वी जो ग्वाल्हेरचा किल्ला व मुलूख घेतला आहे तो समक्ष पाहावा. त्यावरून ते ग्वाल्हेरीस गेले आणि तें शहर व तो किल्ला पाहून व विठ्ठल शिवदेव यांनीं तो घेण्यास्तव जी पराकाष्टेची मर्दुमी केली होती ती ऐकून त्यांजवर त्यांची पराकाष्टेची मेहेरबानगी झाली. दादासाहेब यांचे ग्वाल्हेर येथील मुक्कामांत त्यांस दिल्लीचे बादशाहाचा वजीर मिरशाबुद्दीन याजकडून आकस्मात आदरपूर्वक बोलावण्यास वकील आला, त्यावरून ते एक लाख फौजेनिशीं दिल्लीस कूच करून गेले. त्या बोलावण्याचें कारण पुढें लिहितों.

सन १७५३ इसवी सालीं आफघानस्थानचा बादशाहा अहमदषाह हा हिंदुस्थानावर स्वारी करण्याचे इरायानें एक जबरदस्त फौजेनिशीं अटक नदी उतरून आला. त्यास माघारा घालविण्यास दिल्लीचे बादशाहास त्या वेळेस सामर्थ्य नव्हतें म्हणून त्यानें लाहोर व मुलतान हे दोन सुभे अहमदषाहा यास देऊन त्याबरोबर तह केला. या दोन सुभ्यांत दिल्लीचे बादशाहाचा मीरमन्नू नांवें जो कामगार होता तो जुना माहीतगार असून अबदालीची ताबेदारी करण्यास राजी झाला, सबब त्या बादशाहानें त्यासच त्या दोन सुभ्यावर कायम ठेविलें. पुढें दिल्लीचा वजीर मीरशाबुद्दीन यानें पंजाबास जाऊन अदिनाबेग नांवाच्या ज्या राज्यकारस्थानी पुरुषाचे कारणास्तव पूर्वीं अबदाली यानें त्या मुलुखावर स्वारी केली होती त्या पुरुषास हातीं धरिलें आणि त्याचे मदतीनें दोन्ही सुभ्यांत अंमल करून त्यासच आपल्या तर्फेनें दोन्ही सुभ्यांचा सुभेदार नेमिलें. हें वर्तमान अबदाली बादशाहास समजतांच त्यानें सन १७५५ सालीं बिन्न हरकत दिल्लीवर येऊन तें व मथुरा अशीं दोन्हीं शहरें लुटून पस्त केलीं.

वजीर मीरजाशाबुद्दीन यामध्यें त्या बादशाहास जिंकण्याचे सामर्थ्य नव्हतें सबब त्यानें त्याची खुषामद करून माफी मिळविली. तथापि त्या वजीरास आकळून धरावें म्हणून अबदाली बादशाहानें नजीबउद्दौला नांवाच्या रोहिले सरदारास अमीरउलउमराव असा खिताब देऊन दिल्लीचे दरबारांत त्यास मुख्य वजीर नेमिलें, आणि आपण आफघानस्थानास परत गेल्यावर सदहू दोन्ही सुभ्यांवर आपले तर्फेचे कामगार पाठवून दिले, परंतु ही व्यवस्था मीरशाबुद्दीन यास न आवडून त्यानें प्रथम नजीबउद्दौला यास दिल्लीतून हाकून देण्याचा निश्चय केला, आणि तो निश्चय शेवटास नेण्यास्तव रघुनाथराव दादासाहेब यास वर लिहिल्याप्रमाणें बोलावणें पाठविलें; तें स्वीकारून दादासाहेब दिल्लीस कूच करून गेले. तेणेंकरून नजीबउद्दौला यास आपले जिवाचें रक्षण कसें होईल याविषयीं फिकीर प्राप्त झाली.

ही कामगिरी बजाविण्यास दादासाहेब यांनीं विठ्ठल शिवदेव यांस नेमिलें असतां, त्यांनीं दिल्ली शहर घेऊन मोघल बादशाहाचें मीरशाबुद्दीनाशीं सख्य करून दिलें, आणि नजीबऊद्दौल्याचेही लष्करावर हल्ला केला; परंतु तो रोहीलखंडास पळून गेला. नजीब उद्दौला मोघल बादशाहा यासही आवडत नव्हता, यामुळें विठ्ठलराव यांजवर बादशाहाची मर्जी प्रसन्न होऊन त्यांनीं त्यांस भर दरबारांत उंची पोषाग, जवांहीर, *मोर्चेलाची जोडी आणि आपले हातांतील तरवार देऊन " राजे उमदेतुलमुल्क बाहादर " असा खिताब दिला. ही तरवार अद्यापपर्यंत विंचूर येथें विठ्ठल शिवदेव यांचे वंशजापाशीं कायम आहे. या खेरीज चांदवड तालुक्यांत

---

* विठ्ठल शिवदेव यांस बादशाहाकडून मोर्चेलें वारविण्याचा मान मिळाला; पण हा मान आपले मालिक पेशवे यांस नाहीं, तेव्हां आपण जर तो स्वीकारला तर मालिकांची बेआदबी होईल असें समजून त्या मोर्चेलाचा उपयोग आपण खुद्द न करितां तें मोर्चेल त्यांनीं आपले घोड्यावरील डंक्यास लावून दिलें.

विंचुरसुद्धां पांच गांवें आणि मनमाड परगणे पाटोदे, दहिवड परगणे वाखारी, चाटोरी परगणे नाशिक, आणि करंजी परगणे कुंभारी अशीं नऊ गांवें इनाम देऊन सनद करून दिली; शिवाय विठ्ठलराव दरबारास येतील तेव्हां त्यांस सरदार लोकांत बसण्याची परवानगी दिली.

दादासाहेब पेशवे यांचा तळ दिल्लीजवळ असतां पंजाबांत असें झालें कीं, अबदाली बादशाहानें आदिनाबेग नांवाच्या ज्या मनुष्यास पंजाबावर नेमिलें होतें त्या मनुष्यावर त्याची इतराजी होऊन त्यानें त्यास पकडण्याकारितां फौज पाठविली. परंतु अदिनाबेगानें शीख लोकांचे मदतीनें ती फौज तूर्त मार्गें हटवून रघुनाथराव याशीं वकीलमार्फत बोलणें लाविलें कीं, "तुम्ही माझें रक्षण करून संपूर्ण पजाबांत अंमल करावा." हें बोलणें कबूल करून दादासाहेबांनीं दरोबस्त फौजेनिशीं पंजाबावर कूच केला. परंतु लाहोर येथें जाहानखान नांवांचा जो सरदार अबदालीबादशाहानें ठेविला होता त्यानें रघुनाथराव याजवर हल्ला केला. तथापि रघुनाथराव यांनीं त्यांचे कितीएक वेळां मोड करून त्यांस अटक नदी पलीकडे पळून जाणें भाग पाडिलें, आणि त्या नदीचे कांठीं भगवा झेंडा उभा करून आपले स्वारांचे घोड्यांस त्या नदीचें पाणी पाजिलें. नंतर त्यांनीं मुलतानावर कुच करून तेथील ही दुराणी बादशाहाचें ठाणें मारून टाकिलें; मग आदिनाबेग यास मुलतान व लाहोर या दोन सुभ्यांचा सुभेदार करून त्याचे रक्षणा कारितां पंजाबांत पंचवीस हजार फौज ठेविली. त्याच प्रमाणें लाहोरचे फौजेस मदत करण्यास व रजपूत लोकांपासून खंडण्या वसूल करण्यास जनकोजी शिंदे यांस कांहीं फौजेनिशी दिल्ली जवळ ठेविलें. आणि माळव्यांत बंदोबस्त राखण्या कारितां मल्हारराव होळकर व दत्तोजी सिंदे यांस ठेऊन आपण पुण्याकडे कूच केला. इतक्यांत रजपुतान्यांत कांहीं बखेडा झाल्याचें वर्तमान आलें सबब त्यांनीं तात्काल तिकडे जाऊन अज-

मीर काबीज केलें. आणि जोधपूर वाल्यापासून खंडणी घ्याव-याची तिचा ठराव केला. नंतर ते पुण्यास आले. ही गोष्ट सन १७५८ चे आखेरीस झाली.

दादासाहेब पुण्यास पोहोंचले त्या वेळेस त्यांजवळ रोकड शिलक मुळीच नसून उलटे त्यांस ऐंशी लाख रुपये कर्ज होतें. त्यांनीं मुख्य कारभारी सदाशिवराव भाऊ पेशवे यांजकडे त्या स्वारीचा जो हिशेब गुजराविला, त्यांत कर्जाची रक्कम ऐंशी लाख रुपये होती. ती पाहून ते दादासाहेब यांस रागानें बोलले कीं " स्वारीस जाऊन द्रव्य कमावून अणावयाचें तें तर एकीकडेसच राहिलें; उलटे माथीं कर्ज घेऊन आलां हें शाहाणपण कोठचें ? " त्याजवर दादा साहेब बोलिले कीं " कोणतीही गोष्ट प्रत्यक्ष करून पाहिल्या शिवाय अनुभव येत नाहीं. स्वारींत कधीं मिळकत होते व कधीं प्रसंगानुरूप नुकसानही होतें. हाल्लींचे स्वारींत पुष्कळ फौज ठेवावी लागली, यामुळें मनश्वी खर्च वाढून कर्ज करावें लागलें, यांत माझा कांहीं कसूर नाहीं; परंतु मला कांहीं कळत नाहीं असें आपणास वाटत असेल तर, मी घरीं बसून लिहिण्याचें काम करितों, आणि स्वारीवर आपणच जात जावें. " हेंच बोलणें त्यांनीं खरें केलें, कारण, त्यांनीं त्यावेळे पासून तरवार म्यान्यांत घालून लेखणी हातीं धरिली. त्या वेळेपासून असा नेम ठरला कीं, रघुनाथराव यांनीं पुण्यांत राहून कारभार पाहावा. आणि सदाशिवराव यांनीं स्वारीस जात जावें.

आपल्या महाराष्ट्र देशाची स्थिति त्या वेळेस अत्यंत वर्णनीय होती. बाजीराव साहेबांनीं जो कित्ता एकदा घालून दिला होता, तोच वळविण्यास सर्व सरदार आणि पदरचे मुत्सद्दी हे नेहेमीं कंबरा बांधून तयार असत. तो प्रकार असा कीं, पर्जन्य काळ संपला कीं सर्व सरदार आपापला लढाईचा कट्टा सरंजाम आणि शूर शिपाई बरोबर घेऊन पेशव्याचे तळावर येऊन दाखल होत. मग पेशव्याचा जरीपटका जिकडे फिरेल तिकडे सर्व सैन्यांतील

प्रत्येक शिपाई त्यांची पाठ राखण्यास हातावर शीर घेऊन उभा असे. पेशवे दर साल विजया दशमीच्या मुहूर्तानें ज्या दिशेस जावयाचें असेल त्या दिशेस ढाला देऊन त्याच सुमुहूर्तावर शहरांतून त्यांची स्वारी पुण्यांतील सर्व सरदारांसह बाहेर पडत असे; ही गोष्ट शोधक वाचकांस माहित असेलच. आज हा प्रांत घेतला, उद्यां तो प्रांत घेतला, अशा रोज नव्या खबरा पुण्यास येत. पेशव्यांची स्वारी आज कर्नाटकांत आहे; तेथून उद्यां गुजराथेंत जाणार; तेथून माळव्यांत जाणार; तिकडील व्यवस्था झाली कीं, निजामाकडे स्वारी फिरणार! अशा धारिष्टाच्या वार्ता नित्य लोकांच्या कानीं पडत! दिल्ली कोणीकडे! ग्वाल्हेर कोणीकडे! बंगाला कोणीकडे! पण या सर्व ठिकाणीं दक्षिणेचे घोडे जाऊन अटकेचें ही पाणी प्यालें होतें! भिवरथडीचे घोडे मोठे मेहनती! आपल्या धन्या बरोबर प्रांतो प्रांतीं फिरतांनां त्यांनीं अपला पाय जमिनीस देखील पुरता टेकिला नाहा! धन्य त्या घोडयांची व त्यांच्या धन्यांची! या मराठयांच्या वर्तना वरून कित्येक लोक (गुजराथी, बंगाली इत्यादि) त्यांस लुटारू म्हणत असत; व मुसलमानी बादशाहींतील लोक गनीम म्हणत असत; परंतु वस्तुतः ते केवळ लुटी साठींच देशांतरास जात असत असें नाहीं; तर, स्वराज्य स्थापण्याचें विलक्षण वारें त्यांच्या आंगांत सदोदीत भरलेलें असल्यामुळें कोठें अंमल बसविण्यास, कोठें खडणी घेण्यास, कोठें परचक्राच्या कचाटयांतून एकाद्या राजास सोडविण्यास, अशा अनेक तऱ्हेच्या कारणांनीं त्यांनीं सर्व हिंदुस्थानभर आकांड तांडव केलें. त्यामुळें शंभर वर्षांत ह्या भरत खंडामध्यें ब्राम्हणाचा पगडा असा पडला कीं, तो अझूनही आमच्या वैभवाचा नगारा वाजण्यास कारणीभूत झाला आहे! असो; पेशव्यांनीं कामगारिस्तव निरनिराळ्या देशास सरदार योजिलेतेः— सिंदे, होळकर, विंचूरकर, राजेबाहादर; बुंदेले वगैरे हे उत्तर हिंदुस्थानांतील सरदार; या सरदारांनीं उत्तरेस स्वाऱ्या करून

मुलूक काबीज करावा व खंडण्या घ्याव्या. पटवर्धन, रास्ते, पेठे वगैरे हे कर्नाटकचे सरदार; यांनीं त्याप्रांतीं वसूल वाढवून मुलूख घ्यावा. आणि आंग्रे, धुळप, खानवेलकर, माणकर, बिवलकर, हे कोकणचे सरदार यांनीं गोव्यापासून सुरते पर्यंत मुलूख घ्यावा. अशी राज्य व्यवस्था ज्या वेळेस होती त्यावेळेस संपत्ती आमच्या या महाराष्ट्र देशांत पाणी भरीत होती यांत नवल तें काय ? सालोसाल नवी संपत्ती, नवे जवाहीर, नवे घोडे, नवे हत्ती, नव्या पालख्या, नवे जरतार, नवीं वस्त्रें, नवीं शस्त्रें, इत्यादि अनेक प्रकारचें सामान या महाराष्ट्र देशांत येत असे. या शिवाय नवीन मुलूख दरसाल राज्यांत सामील होत असे, हें वर लिहिल्यावरून लक्षांत येईलच. नारो आपाजी तुळशींबागवाले हे पुणें प्रांताचे सुभे; नगरकर हे नगर प्रांताचे सुभे; भवानी शिवराम व पुढें हरी चिंतामण दिक्षीत हे अहमदाबादेस गुजराथचे सुभे; रामाजी माहादेव बिवलकर हे ठाण्याचें सुभे; विसाजीपंत लेले हे वसईचे सुभे; परशुराम भाऊ पटवर्धन हे कर्नाटकचे सुभे आणि नारोशंकर राजे बाहादर हे खानदेशचे सुभे, होते. असे महान योद्धे व राज कारणी पुरुष जेथें निपजले त्या सभाग्य देशाची स्थिती काय वर्णावी ! शंभरवर्षांत हा देश केवळ स्वर्गतुल्य बनून गेला होता ! आतां तो सर्व प्रकार जाऊन दसऱ्याचे दिवशी नुसतें शस्त्र आणि वारू यांचे पूजनाचें मात्र काय तें कर्तव्य कोठें कोठें उरलें आहे हें पाहून अत्यंत वाईट वाटतें !

सन १७५९ इसवी सालीं निजामाचे अहमदनगर येथील पठाण किल्लेदारानें पेशव्यांस अनकूल होऊन तेथील किल्ला त्यांचे हवाली केला. हें वर्तमान सलाबतजंग व निजाम अल्ली यांस कळतांच त्यांस अत्यंत संताप येऊन त्यांनीं तो किल्ला पेशव्याचे हातून हिसकावून घेण्यास्तव धारूरास पुष्कळ फौज रवाना केली आणि आपण मागाहून सात हजार निवडक फौजे निशीं धारूराकडे कूच केला.

हें वर्तमान पेशवे यांस समजतांच नाना साहेब व भाऊ साहेब यांनीं चाळीस हजार स्वार व पांच हजार कवाईती पायदळ बरोबर घेऊन पुण्याहून कूच केला आणि झपाटचानें चालून त्या उभयतां नबाबास उदगीर येथें गाठिलें. तेव्हां त्या नबाबानीं मोठचा शौर्यानें लढाई करून पेशव्याची बहुतेक कवाईती फौज मारून टाकिली; परंतु पेशव्यास मागून एकाएकीं कुमक आल्यानें नबाबाचा अगदीं मोड झाला. मग उभयतां नबाबांनीं पेशव्यांबरोबर बोलणें लावून तह केला. ह्या तहामुळें पेशव्यानीं पूर्वीं घेतलेला अहमदनगरचा किल्ला व शहर आणि त्या खालचा मुलूख असें त्यांच्या ताब्यांत राहून शिवाय उभयतां नबाब बंधू पासून त्यांस दौलताबाद, शिवनेरी, (जुन्नर) असेरी, व बिजापूर येथील किल्ले व शिवाय ६२ लाख रुपयांचे वार्षिक उत्पन्नाचा मुलूख प्राप्त झाला. हा तह सन १७६० सालीं झाला.

प्रकरण ५ वें.

पानिपतची लढाई.

उदगीर येथें तह होऊन पेशवे नानासाहेब व भाऊसाहेब पुण्यास येत असतां, त्यांचे लष्कराचा तळ मांजरा नदीचे कांठीं होता, तों त्यांस विपरीत वर्तमान कळलें, तें असें कीं "काबूलचा अबदाल्ली बादशाहा यानें हिंदुस्थानावर स्वारी करून लाहोर व मुलतान येथील मराठचाची ठाणीं मारिलीं; आणि हिंदुस्थानचे मध्य भागांत येऊन होळकर व इतर मराठे सरदार यांचा अगदीं मोड करून टाकिला; दत्ताजी सिंदे व जोतीबा सिंदे हेही त्यांचे छाप्यांत मारले गेले; आणि त्याचें लष्कर गंगा यमुनेचे अंतर वेदींत

बिन हरकत पोहोंचलें." उदगीर येथें सहज जय झाल्यामुळें सदाशिवरावभाऊ यांस मोठा गर्व होऊन आपण अजिंक्य योद्धे असें त्यांस वाटूं लागलें होतें आणि अबदाली बादशाहास जिंकण्यास काय तजविज करावी या बद्दल विचार झाला त्या वेळेस ते म्हणाले कीं मी व विश्वासराव पेशवे यांस उत्तर हिंदुस्थानचे स्वारीवर नेमले असतां आम्ही अहमदशाहास जिंकून अटक नदीपार घालवून देऊं." हें त्यांचें बोलणें नानासाहेब पेशवे यांनीं कबूल करून त्या मोहिमेवर जाण्याची तयारी करण्याविषयीं त्यांस हुकूम दिला. त्याप्रमाणें हुजुरातीतील सर्व स्वारांच्या पागा, इब्राहीमखान गारदी याचे हाताखालची दाहा हजार कवाइती फौज, दोनशे तोफा, आणि मालिक विश्वासराव पेशवे यांसह सदाशिवराव भाऊ यांनीं पुण्याहून कूच केला. त्या वेळेस त्यांजबरोबर बळवंतराव मेहेंदळे, षमशेर बाहादर, नारो शंकर राजे बाहादर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, त्रिंबकराव पुरंदरे, शिवाय किती एक मराठे सरदार आपापल्या हाताखालच्या स्वारांनिशीं होते. हें लष्कर माळव्यांत गेल्यावर त्याचा तळ शिरोज येथें पडला. तेथें यशवंतराव पवार, दमाजी गाईकवाड, मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे, गोविंदपंत बुंदेले, अंताजी माणकेश्वरकामरगांवकर वगैरे कित्येक सरदार येऊन त्यांस मिळाले.

पेशव्यांचें लष्कर तेथून निघून ग्वाल्हेरीस पोहोंचल्यावर भाऊसाहेब यांनीं अहीरवाडा व खेतवाडा हे प्रांत काबीज केले. त्या वेळेस नरवरवाले राजाकडून कांहीं मगरुरीचें वर्तन झालेलें त्यांचे दृष्टोत्पत्तीस आल्यामुळें तें संस्थान अजी खालसा करण्याचें भाऊसाहेब यांचे मनांत आलें; परंतु विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांनीं सक्त रदबदली करून त्या संस्थानाचा बचाव केला. तो उपकार समजून नरवरवाले राजानें विठ्ठल शिवदेव यांस सहस्राव तालुका आणि बढे गांव असें इनाम दिलें. त्या दोन्ही उत्पन्नाचा एकंदर आकार सालीना रुपये वीस हजार होता. त्या-

चप्रमाणें विठ्ठल शिवदेव यांनीं सोपूरवाला राजा याचाही बचाव केला. सबब त्या राजानें आपले संस्थानांपैकीं एक तालुका त्यांस इनाम दिला. हीं एकंदर उत्पन्नें पुढें सन १८१८ सालीं इंग्रजसरकारानें विठ्ठल शिवदेव यांचे वंशांतील चवथे पुरुषापासून हरण केलीं. सोपूरचे संस्थान मारवाडचे सरहद्दीवर पुष्कर तीर्था जवळ असून तें हाल्लीं सिंदे यांचे राज्यांत सामील झालें आहे.

पेशव्याचें लष्कर ग्वाल्हेरीहून निघून त्याचा तळ चंबल नदीचे कांठीं पडल्यावर मल्हारराव होळकर याचे दोस्तीमुळें भरतपूरचा जाट राजा सुरजमल हा पुष्कळ फौजेनिशीं येऊन त्या लष्करांत मिळाला. नंतर या मोठ्या फौजेनिशीं भाऊसाहेबांनीं दिल्लीवर जाऊन त्यांत अंमल केला. तेथें पावसाळ्यांत चार महिनेपर्यंत मुक्काम झाल्यावर भाऊसाहेबांनीं अबदाल्ली बादशाहाचे कुंजपुरा येथील ठाण्यावर हल्ला करून त्याची कत्तल केली. ही खबर अबदाल्ली बादशाहास कळताच त्यानें लवकरच यमुना नदी उतरून दिल्लीकडे कूच केला. भाऊसाहेब यानीं ही दिल्लीहून कूच केला. उभय दळें एकमेकाजवळ आल्यावर लढाई सुरू झाली. तींत अबदाल्लीचा जय झाला. त्याजवर कितीएक लढाया झाल्या; परंतु मराठी फौजेसच मागें हटावें लागलें. याप्रमाणें हटतां हटतां ते पानिपत गांवाजवळ पोहोंचले. तेथें इब्राहिम्‌खान गारदी याचे सूचनेवरून भाऊसाहेबांनीं मोर्चे बांधून त्यांत तळ केला. अहमदषाहानेंही तेथून चार कोसांवर तळ केला, त्यामुळें वारंवार चकमकी झडूं लागल्या, त्यांत कधीं पेशव्याचा व कधीं अबदाल्लीचा या प्रमाणें जय झाले. शेवटीं तारीख ७ जानेवारी सन१७६१इसवी रोजीं सकाळीं संपूर्ण मराठी फौज दुराणी फौजेवर चालून जाऊन मोठ्या निकराची लढाई सुरू झाली. तींत अर्डीच प्रहर दिवसापर्यंत मराठ्यांचा जय झाला; परंतु या सुमारास विश्वासराव पेशवे यांस जखमा

लागून त पडले असतां, भाऊसाहेब यांस शेवटीं जय होण्याची आशा वाटेनाशी झाली. मग ते स्वतः दुराणी फौजेंत घुसून दिसेनासे झाले. त्यामुळें मराठी फौज घाबरून चोहीकडे पळून गेली. तिचा पठाण लोकांनीं पाठलाग करून मोठी कत्तल उडविली.

यालढाईंत गोविंदपंत बुंदेले व बळवंतराव मेहेंदळे हे मरण पावले. जनकोजी शिंदे, इब्राहिम्खान गारदी व येशवंतराव पवार हे अतिशय जखमी होऊन पडल्यामुळें धरले जाऊन दुराणी लष्करांत मारले गेले. शिवाय बाजार बुणग्यासुद्धां आजमासे दोन लाख मनुष्यें प्राणास मुकलीं. षमसेरबाहादर व दमाजी गाईकवाड हे जखमी होऊन पडले होते; परंतु ईश्वर इच्छेनें रणांतून निघून गेले. पैकीं षम्सेरबाहादर हे भरतपुरास गेले, परंतु लागलेल्या जखमांच्या योगानें ते तेथें मरण पावले. दमाजी गायकवाड पुष्कळ क्लेश सोसून दक्षिणेंत आले. मल्हारराव होळकर ही कांहीं फौजेनिशीं देशीं आले. नारोशंकर राजे बाहादर या लढाईचे वेळेस बंदोबस्ताकरितां दिल्लीस ठेविलेले होते. त्यांस ह्या पराजयाचें वर्तमान समजतांच तेथील पुष्कळ दौलत घेऊन ते दक्षिणेंस परत आले.

भाऊ साहेब पेशवे हे मराठी लष्करानिशीं दिल्लीं जवळ असतां, त्यांची स्थिति काय होती याची खबर नाना साहेब पेशवे यांस चार पांच महिन्यांत लागली नव्हती; त्यामुळें तिकडे कांहीं सुचिन्ह नाहीं असें त्यांस वाटलें, सबब ते बरोबर कनिष्ट बंधू दादा साहेब, नागपूरचे जानोजी भोसले, आणि कितीएक मराठे सरदार व मानकरी मिळून सुमारें साठ हजार फौज घेऊन विश्वासराव व भाऊ साहेब यांस मदत करण्याचे उद्देशानें पुण्याहून निघाले. ते नर्मदा नदी उतरून चोळीमहेश्वर पर्यंत पोहचले, आणि त्यांचा मुक्काम तेथेंच असतां, नाना फडनवीस व दुसरे कितीएक मनुष्यें योनीं येऊन त्यांस पानिपतच्या लढाईचा अनर्थकारक परिणाम साद्यंत कळविला. तेणें करून नाना साहेब पेशवे हे अगाध

दुःखसागरांत बुडाले. परंतु दादा साहेब यानीं तें वर्तमान ऐकतांच त्यांस अत्यंत आवेश चढून ते म्हणाले कीं "नाना साहेब! आतां नुकसान झालें तें कितीही शोक केला तरी माघारें यावयाचें नाहीं; मला आज्ञा द्यावी ह्मणजे मी जानोजी भोसले वगैरे मराठे सरदार व ही आपली दरोबस्त फौज बरोबर घेऊन अबदाल्ली दिल्लींत आहे तोंच त्यांस गांठून त्याचें शीर कापून आणितों. इतकें झालें ह्मणजे कांहीं तरी समाधान वाटेल." परंतु नाना साहेब म्हणाले कीं "दादा! तूं म्हणतोस तें खरें आहे व त्या प्रमाणें तूं करावयास चुकणार नाहींस, परंतु जे दोघे गेले ते माघारे आले नाहींत आणि तूं जो एकटाच मजजवळ आहेस, तोही गेलास आणि कदाचीत त्यांच्या प्रमाणेंच तुझी ही अवस्था झालीं तर मला किती दुःख होईल हें माझ्यानें सांगवत नाहीं; या करितां तूं तिकडे न जातां मजबरोबर पुण्यास चल." असें म्हणून त्यांनीं दादासाहेबाच्या स्वारीचा बेत रहीत केला. वर लिहिल्या प्रमाणें दादा साहेब हे फौज घेऊन गेले असते तर कदाचित् ते अबदाल्लीचा सूड घेतल्या वाचून राहिले नसते, कारण, संपूर्ण मराठी राष्ट्राचें शांतवन होण्यास अबदाल्ली व त्याची फौज याची कतल करण्या खेरीज दुसरा उपायच नव्हता; परंतु कोणी नामांकीत सरदार पुढें न झाल्यामुळें त्यांनीं उठावणी केली नाहीं. दादासाहेब जाते तर ते जवांमर्द असून शिवाय लढाया मारून घटलेले होते, या कारणास्तव सर्व मराठी राष्ट्रास स्फुरण येऊन त्यानें अबदाल्लीचा सूड उगविलाअसतां यांत संशय नाहीं. मराठी राष्ट्रांतील मजबूतीची खबर अबदाल्लीचे गुप्त अखबारनवीसांनीं कदाचित् त्यास कळविली असेल, म्हणूनच तो एक वेळां मिळालेल्या जयानें तृप्त होऊन पुढें न चाल करितां मोंगल बादशाहास आपले तर्फेनें दिल्ली येथें तख्तनषीन करून संपूर्ण मोंगलाची बादशाहात त्यास बहाल केल्यानंतर सत्वर काबुलास निघून गेला.

पानिपतचे लढाईंत कितीएक मोठमोठाले सरदार व हजारों

शूर शिपाई व अजमासे दीड लाख बाजारबुणगे मारले गेले; शिवाय ऐन तारुण्याचे भरांत आलेले, सुस्वरूप, सद्गुणी, मोठे जवांमर्द व पेशवे पदारूढ होण्यासयोग्य झालेले असे नानासाहेब यांचे वडील पुत्र युवराज विश्वासराव व राजकार्यधुरंधर असे त्यांचे सख्खे चुलत बंधू सदाशिवरावभाऊसाहेब हे नाश पावले; खेरीज त्यांची स्नुषा ह्मणजे विश्वासराव यांची गुणवती, सुस्वरूप व तरूण अशी पत्नी हिची काय अवस्था झाली त्याचा मुळींच शोध लागला नाहीं; आणि उत्तर हिंदुस्थान प्रांतीं पेशव्यांची सत्ता व जरब नाहींशी होऊन मोठमोठाल्या राजे लोकांत त्यांची नाचक्की झाली, या व आणखी कितीएककारणामुळें नानासाहेब पेशवे यांच्या मनास अनिवार्य दुःख होऊन त्यांस वेड भरल्यासारखें झालें, आणि पुढें काय करावयाचें हें त्यांस न सुचून माघारें जाण्याचेंही त्यांचे मनांत येईना; तथापि कनिष्ट बंधू दादासाहेब व जानोजी भोसले वगैरे कितीएक सरदार व मुत्सद्दी व इतर संभावीत व पोक्तवयस्क लोक यांनीं त्यांची पुष्कळ प्रकारें समजूत केल्यावर, सर्वांचे मर्जीस्तव त्यांनीं पुण्याकडे कूच केला आणि ते लाहान मजला करीत करीत नाशिकास सुरक्षितपणें पोहोंचले.

वर लिहिलेल्या लढाईची साद्यंत हकीकत बहुत शोधक ग्रंथकारांनीं लिहिली आहे सबब त्या लढाईचा अधिक विस्तार येथें न लिहितां, हें चरित्र विठ्ठल शिवदेव यांचें आहे सबब त्या पुरुषाची तांत काय व्यवस्था झाली हे वाचकांचे माहिती करितां पुढें साद्यंत लिहितों.

विठ्ठल शिवदेव आपले फौजेसुद्धां त्या रणभूमीवर असतां त्यांस त्या प्रसंगीं जितका पराक्रम करितां आला तितका त्यांनीं केला; परंतु ईश्वरेच्छेनें शेवटीं जी गर्दी झाली तींत त्यांची बहुतेक फौज मारली जाऊन त्यांस तीन जखमा लागल्या. पैकीं तरवारेची जखम कपाळावर, बर्चीची उजवे पायावर व तीराची डावे

मांडीवर याप्रमाणें लागल्या. या जखमामुळें ते व्याकूळ होऊन रणभुमीवर पडले होते. त्यांचा विश्वासू हुजऱ्या बाळाजी जगताप वाकीकर हा रणभूमीवर त्यांचा शोध करीत असतां, त्यास अकस्मात मोतीराम कनोजिया ब्राम्हण (जो ग्वाल्हेरच्या हल्ल्यांत शौर्य करून योग्यतेस चढला होता तो) भेटला. नंतर ते उभयतां आपले धन्याचे शोधार्थ फिरत असतां, दुसऱ्या दिवशीं विठ्ठलराव हे जखमा लागून पडलेले त्यांच्या दृष्टीस पडले. त्यांस पाहातांच ते उभयतां त्यांजवळ धांवत गेले. त्यांपैकीं एकाजवळ फुटाणे होते ते अगोदर त्यांनीं त्यांस खावयास देऊन सत्वर पाणी आणून पाजिलें; आणि पागोटें फाडून त्यांच्या जखमा बांधिल्या. नंतर रात्रीं सामसूम झाल्यावर हुजऱ्या बाळा जगताप यानें त्यांस पाठीशीं बांधून रणभूमी बाहेर नेलें; आणि आड रस्त्यानें चालून सुमारें पाच कोसांवर एक गांव होतें तेथें सर्वांनी मुक्काम केला. मोतीराम ब्राम्हण याचे कंबरेस दीडशें तोळे सोनें होतें; व हुजऱ्याजवळही कांहीं सोनें नाणें होतें तें या प्रसंगीं फार उपयोगीं पडलें. दिल्लीचा मार्ग चुकवून आड मार्गानें चालत असतां पांचवे दिवशीं त्यांनीं मोठा रस्ता धरिला, तों पुष्कळ मराठे लोक परत जातांना त्यांच्या दृष्टीस पडले; तेणेंकरून त्यांस बहुत संतोष झाला. मग ते त्या मराठ्यांत मिसळून पुढें चालले, तों खुद्द विठ्ठल शिवदेव यांच्याही फौजेपैकीं कांहीं लोक त्यांस भेटले. नंतर वाटेंत एक मोठा गांव लागला, तेथें सर्वांनीं मुक्काम केला. भेटलेल्या मंडळींत एक शस्त्रवैद्य होता. त्यानें विठ्ठल शिवदेव यांच्या जखमा पाहून त्यावर जे औषधोपचार करावयाचे ते केले. नंतर त्या गांवांत आठ दिवस त्यांचा मुक्काम झाला. तेव्हां विठ्ठल शिवदेव यांस कांहीं हुषारी वाटली. मग त्या हुजऱ्यानें एक तट्टू खरेदी केला आणि त्याजवर त्यांस बसवून पुनः सर्व चालते झाले. मार्गांत लष्करांतील आणखीही लोक त्यांस भेटले. त्या सर्वांस विठ्ठलराव यांनीं अश्वासन देऊन आपल्याबरोबर ग्वालेरीस नेलें.

तेथें त्यांचे तर्फेचा हुद्देदार गोविंद शामराव होताच, आणि तो प्रांतही त्यांचेंच कबजांत असल्यामुळें बरोबर आलेल्या सर्व लोकांचा त्यांस उत्तम प्रकारें बंदोबस्त ठेवितां आला. त्यांनीं ज्या ज्या मनुष्यास ज्या ज्या वस्तूची जरूर होती ती ती त्यास दिली; शिवाय वाटखर्चासही पैसा देऊन दक्षिणेकडे सर्वांस रवाना केलें. विठ्ठल शिवदेव हे या मोहिमेवर गेले त्यावेळेस त्याजबरोबर त्यांचे कुटुंबाचीं माणसें मुळींच नव्हतीं हें फार चांगलें झालें, कारण ज्या इतर सरदारांनीं व मुत्सद्यांनीं आपलीं माणसें बरोबर नेलीं होतीं त्यांवर पुढें वाईट प्रसंग कोसळून त्यांचे माणसांची जी दुर्दशा झाली ती ऐकिली म्हणजे अंगावर रोमांचच उभे राहतात!

पानिपतचे लढाईंत पराजीत होऊन शेष राहिलेल्या लोकां पैकीं कांहीं लोकांचा समाचार विठ्ठल शिवदेव यांनीं ग्वालेर येथें शक्त्यनुसार घेतला; पण, याही पेक्षां जे शेकडो लोक अत्यंत संकटांत पडून भरतपुराकडे पळून गेले त्या लोकांस तेथील राजा सुरजमल यानें उत्तम प्रकारें साह्य केलें आणि मार्ग क्रमणा पुरती शक्ती आल्यावर त्यांस खर्चास देऊन दक्षिणेस रवाना केलें. या कारणानें त्या जाट राजाची फार मोठी कीर्ति झाली; ती चिरकाल राहील यांत संशय नाहीं.

याच प्रमाणें मल्हारराव होळकर यांचे पदरचे फडणवीस यांनीं पानिपतचे रणभूमींतील प्रेतें व अस्थि गाडयांत भरून भागीरथींत टाकिल्या. या कामीं त्यांस जरी मोठा खर्च आला तरी तो करण्यास त्यांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं. याच पुण्य पुरुषानें श्रीत्र्यंबकेश्वर क्षेत्रीं कुशावर्त तीर्थाचें कुंड, फरस वगैरे बहुत खर्चानें बांधिलें आहे. यामुळें तेथें जाणाऱ्या यात्रेकरू लोकांची फारच सोय झालेली आहे. या फडणवीसाचे वंशज अद्यापी इंदुरास फडनविशी दफ्तराच्या हक्काचा उपभोग घेताहेत.

ग्वाल्हेर मुक्कामीं विठ्ठल शिवदेव यांच्या जखमा अगदीं बऱ्या होऊन त्यांचे चित्तास समाधान वाटल्यावर ज्या नौकर लोकांनीं

पानिपत्चे रणभूमींत त्यांस शोधून काढून त्यांचा प्राण वाचविला होता त्या नौकरास त्यांनी इनामें दिलीं; त्यांत बाळा जगताप नांवाच्या इमानी हुजऱ्यास विंचुरानजीक एके गांवीं दीडशे रुपये आकाराचे जमिनीची सनद करून दिली. ह्या इनामाचा उपभोग जगताप मजकूर याचे वंशज घेत असून त्यापैकीं एकजण हाल्लीं विंचूर संस्थानांत खिजमतगारीचे कामावर आहे.

विठ्ठल शिवदेव यांस घोड्यावर बसून सफर करण्याची ताकद आल्यावर ते तेथून निघून नर्मदा तिरीं आले, तों त्यांनीं असें वर्तमान ऐकिलें कीं, नाना साहेब पेशवे यांची स्वारी तेथपर्यंत आली होती; परंतु पानिपतचें अत्यंत दुःखकारक वर्तमान ऐकून पुण्यास परत गेली. त्यांचे पाठीमागून विठ्ठल शिवदेवही निघाले; आणि दर मुक्कामास पेशव्यांचे लष्कराचा शोध करीत करीत ते खानदेशांत आले. तेव्हां श्रीमंताची स्वारी गोदावरीच्या काठीं आहे अशी त्यांस खातरीलायक बातमी समजली. त्यावरून विंचूरास मुलामाणसांच्या भेटीस न जातां परभारेच ते पेशव्यांचे स्वारींत दाखल झाले. श्रीमंत डेऱ्यांत होते तेथें जाऊन त्यांस त्यांनीं साष्टांग नमस्कार घातला; आणि हात जोडून म्हणाले कीं "दुर्दैवानें जो नाश झाला त्याविषयीं सर्व हकीकत श्रुत झालीच असेल. मी बहुत पापी म्हणून अनेक दुःखें व संकटें प्राप्त झालीं असतां ही वांचलों. ईश्वर इच्छेस उपाय नाहीं. हेतू धरिला त्या प्रमाणें स्वामीचरण दृष्टीस पडले. स्वामिनीं कृपाकरून मला दोन गांव इनाम दिलेच आहेत. शिवाय सरकारच्या आश्रयानें मीं कांहीं वतनेंही खरेदी केलीं आहेत. त्यांत माझ्या मुलामाणसांचा गुजारा होईलच. त्यांनीं नेकीनें सेवा केली असतां स्वामीही उपेक्षा करणार नाहींत असा मला पक्का भरंवसा आहे. जोंवर माझ्या शरीरांत बरेंच सामर्थ्य आहे तोंवर पृथ्वीवरील तीर्थयात्रा कराव्या आणि उत्तम तीर्थीं देह ठेवावा असा माझा दृढनिश्चय झाला आहे. याकरितां माझी शेवटची इतकीच प्रार्थना आहे कीं, स्वा-

मिनीं कृपाकरून मला आपला निश्चय शेवटास नेण्याविषयीं आज्ञा द्यावी. याशिवाय मला आतां कोणतीच इच्छा नाहीं. " असें बोलून त्यांनीं नेत्रांस आश्रु आणिलें. श्रीमंतही कष्टी झाले. नंतर विठ्ठलराव यांस जवळ बसवून घेऊन श्रीमंत त्यांस म्हणाले कीं " तुम्ही सूज्ञ असून असें कसें बोलतां ? शूराचे वंशांत आपण जन्मलों आहों. शत्रूचा सूड घेतल्यावांचून राहू तर आपले वडील आपणांस स्वर्गलोकीं हंसतील; याकरिता पुनः जमाव करू. शत्रूस कधीं तरी हात दाखवूं; शिवाय दुसरें कांहीं कर्तव्य नाहीं. आम्ही पुण्यास पोहचूं तों पर्यंत तुम्हीं स्वारीबरोबर असावें. " ह्या आज्ञे प्रमाणें विठ्ठलराव यांनीं वर्तनक्रम सुरूं ठेविला. श्रीमंतांचा निकट वास असल्यानें भोजनाचे वेळेस व दिवसा रात्रीं पानिपतचे लढाईंत काय काय हकीकत झाली, कोण सरदार कसा वर्तला, कोणी काय शूरत्व केलें, युद्धांत कोण कच खाऊन पळाला, या गोष्टीश्रीमंतांनीं त्यास नेहेमी पुसाव्या व विठ्ठलरावांनींहि त्यांची यथार्थ उत्तरें द्यावीं. असा क्रम मार्गांत हमेषा चालला होता. वाटेच्या मजलाही फार लाहान लाहान होत असत. एकेसमयीं श्रीमंतांनीं विठ्ठलराव यांस विचारिलें कीं, " मल्हारराव होळकरा विषयीं मंडळीच्या मुखें मी अनेक प्रकारच्या अनेक वार्ता ऐकतों, याकरितां खरी हकीकत असेल ती तुम्ही शफथ पूर्वक सांगा. " त्यावरून विठ्ठलराव यांनीं श्रीमंताचे पायांवर हात ठेवून सांगितलें कीं " स्वामीस कोणी कांहींहि सांगो, परंतु मल्हारराव यांची कोणतेही प्रकारें कसूर नसून युध्धांत त्यांनी कुचराई अथवा फितूर किंवा सरकार चरणी कोणतेही प्रकारची प्रतारणा केली नाहीं. इतकें मात्र झालें कीं, त्यांनीं भाऊसाहेबास हिताची मसलत सुचवावी परंतु दुर्दैवेंकरून ती त्यांचे मनास मुळींच येऊनये—पुणें सोडल्यापासून भाऊसाहेबांच्या प्रकृतींत असा कांहीं विलक्षण फेर फार झाला होता कीं, कोणी त्यांचे हि-

ताची काहीं गोष्ट त्यांस सांगितली असतां ती त्यांचे मनास येऊ-नये. मीही त्यांस किती एक समयीं हिताच्या सुचना केल्या, तेव्हां मी होळकराचा पक्ष संभाळण्याकरितांच असे बोलतों असे कुतर्क त्यांच्या मनात येत. ईश्वर इच्छा जशी होती त्याप्रमाणें गोष्टी घडल्या. त्यास कोणाचाच उपाय नाहीं; पण एकंदरीनें मराठे सर-दारांपैकीं कोणाचीच चूक नाहीं असें मी खातरीनें सांगतों. ''

हा मजकूर विठ्ठलराव यांनीं विंचुरास आपले पुत्र शि-वाजी विठ्ठल व दिवाण चिमणाजी खंडेराव यांस सविस्तर लि-हून कळविला, आणि असें सुचविलें कीं, श्रीमंतांपाशीं झालेल्या भाषणाची सर्व हकीकत मल्हारराव होळकर यांस कळविण्यास्तव त्याजकडे मुद्दाम विश्वासू कारकून पाठवावा. त्याप्रमाणें त्या उभयतांनीं केलें.

श्रीमंताची स्वारी पुण्यास दाखल झाल्यावर विठ्ठलराव यास पूर्ववत सरदारीचें काम चालविण्याविषयीं श्रीमंताची आज्ञा झा-ली; आणि त्याप्रमाणें त्यांनीं क्रम सुरू केला.

नानासाहेब यांचे मनास अत्यंत दुःख झाल्याचा मजकूर वर लिहिलाच आहे. ते पुण्यास आल्यावर वाडयांत न राहातां पर्वतीस* जाऊन राहिले. तेथें उत्तरोत्तर त्यांची प्रकृती क्षीण होत जाऊन शेवटीं त्याच वर्षी जून महिन्याचे आखेरीस त्यांस देवाज्ञा झाली.

---

*हें मंदीर पुण्याचे दक्षिणेस एक मैलाचे अंतरावर एक-लाहान टेकडावर असून नानासाहेब पेशवे यांनींच बांधिलें; व हें ठि-काण मोठें रमणीय असून तेथील हवाही निर्दोषी आहे.

प्रकरण ६ वें.

माधवराव बल्लाळ पेशवे यांची कारकीर्द.

सन १७६१ सालीं सपटेंबर महिन्याचे अखेरीस रघुनाथराव दादासाहेब यानीं आपले पुतण्ये म्हणजे कैलासवासी नानासाहेब पेशवे यांचे पुत्र माधवराव यांस सातान्यास नेऊन सातारचे माहाराज यांजकडून त्यांस पेशवाईचीं वस्त्रें देवविलीं. त्या वेळेस माधवराव यांचें वय १७ वर्षांचें होतें.

रघुनाथराव पुण्यास परत आल्यावर ते पूर्वीप्रमाणें राज्यकारभार पाहूं लागले. इतक्यांत उत्तर हिंदुस्थानांतून असें वर्तमान आलें कीं, पानिपतचे लढाईचा विपरीत परिणाम झाल्यावर त्या प्रांतीं पेशव्याचा कोणी जबरदस्त व नामांकित असा सरदार न राहिल्यामुळें त्यांची जरब अगदीं उडून ग्वाल्हेरीस जाट राजे खटका करूं लागले आणि आहीरवाडा वगैरे जो मुलूख नुकताच काबीज झाला होता त्यांतून काळीचा वसूल बिलकूल येईनासा झाला. माहादजी शिंदे यांचा मुलूख उत्तर हिंदुस्थानांत होता सबब तिकडे जाऊन बंदोबस्त करण्याविषयीं रघुनाथराव यानीं त्यांस हुकूम केला; परंतु शिंदे तिकडे जाण्यास छाती करीनात व त्याचप्रमाणें इतर कोणीही धजेना, सबब शेवटीं त्यानीं विठ्ठल शिवदेव यांस हुजूर बोलावून अशी आज्ञा केली कीं, "माहादजी शिंदे अद्यापि अल्पवयस्क आहेत व तिकडील स्थिति त्यांस माहित नाहीं व तुम्ही पुरातन सरदार असून तुमच्या हातानें कितीएक व्यवस्था पूर्वी लागल्या आहेत, या करितां तुम्हीं त्या प्रांतीं जाऊन योग्य बंदोबस्त करावा. त्या बरहुकूम विठ्ठल शिवदेव ग्वाल्हेरीस निघून गेले. त्यांचे मागून त्यांचे मदतीस नारो शंकर राजे बाहादर यांस श्रीमंतानीं पाठवून दिलें. विठ्ठल शि-

वदेव यानीं पूर्वींप्रमाणें ग्वाल्हेर व आहीरवाडा वगैरे ठिकाणीं पेशव्यांचा अंमल कायम करून काळीचा वसूलही करून घेतला. नंतर श्रीमंतानीं माहादजी व केदारजी शिंदे यांसही त्या प्रांतीं पाठवून दिले. त्या वेळेस दादासाहेब यानीं तिकडील बंदोबस्त ठेवण्याविषयीं विठ्ठल शिवदेव यांस शिंदे याजबरोबर एक तपशिलवार पत्र* पाठविलें.

---

*॥ श्रीशंकर. ॥

राजश्री विठ्ठल शिवदेव स्वामी गोसावी यांसीं.

विनंती उपरि अलीगोहर यास जें पत्र पाठविलें त्याचा मसुदा तुम्हास पाहावयाकरितां पाठविला आहे. हा पाहून हें पत्र द्यावयाचें उपयोगी पडत असल्यास देणें. राजश्री नारो शंकर व तुम्ही एक विचारें राहून करावयाचें तें करणें. हाल्लीं सर्व अखत्यार मशारनिल्हेवरी व तुम्हावरी आहे. रोजकरी यास ऐवज ही नसला तरी नर्मदा पार येऊन माळव्याचा घाट चढून गेल्यावरी सरकारचे माहाल आहेत तेथील ऐवज बेधडक घेणें आणि झाशी, ग्वाल्हेर, सागर, कोटा वगैरे किल्ले कायम राहात तें करणें. किल्ले राखिले म्हणजे तुम्ही फार केली. प्रस्तुत नवा प्रांत साधावा ही गोष्ट होणें कळतच आहे. कदीम जागे राखिले म्हणजे त्यांतच बहुत आहे. राजश्री बाळाजी गोविंद यासही पत्र पाठविलें असे, तरी तुम्ही उभयतां व हे मिळोन बंदोबस्त करणें. प्रस्तुत अबदाल्ली चमेल उतरून येतो असा अर्थ नाहीं. सुजादौला आलिकडे आहेत. ते मात्र लबाडी करतील. ऐशीयास त्याच्यानें तुम्हांवर येबवेल हें होणें नाहीं. तुम्ही नारो शंकर व राजश्री मल्हारबाची फौज तिकडे आहे. ते एकत्र झाल्यावरी मातबर जमाव होईल. त्याजवरी इभ्रत पडून बाकी राहिल्या मुलखाचा बंदोबस्त होईल, गुंता नाहीं. खासा स्वा-

(पुढें चालू.)

विठ्ठल शिवदेव हे उत्तर हिंदुस्थानांत असतां, त्यांचे मागें पुणें येथें सन १७६२ सालीं एक राज्यकारण उपस्थित झालें तें असें;— माधवराव पेशवे हे अल्पवयस्क असल्या कारणानें त्यांची मातुश्री गोपिकाबाई यांस असे वाटे कीं, त्यांस वागविण्याचा मान आपला आहे आणि राज्याची मालकी त्यांची असून रघुनाथराव दादासाहेब हे केवळ त्यांचे ताबेदार आहेत, म्हणून त्यानीं हमेषा माधवरावाचे हुकुमाप्रमाणें वागून आपण त्यांची मातुश्री म्हणून आपल्यास बहुमान देत असावे. रघुनाथराव यांस असें वाटे कीं, आपण कैलासवासी नानासाहेब पेशवे यांचे सख्खे बंधु असून त्यांचे सर्व मसलतींत व स्वाऱ्यांत व राज्यकाराभारांतही भागीदार होतों. माधवराव पेशवे हे केवळ अल्पवयस्क व अज्ञान

(मागील पृष्ठावरून पुढें चालू)

रीच यंदा हिंदुस्थानांत यावी असा प्रकार होता; परंतु राहावे असा मनसबा येऊन प्राप्त झाला. राहिलों. चिकोडीपर्यंत करनाटकच्या बंदोबस्तास गेलों. तेथून चिरंजीव राजश्री राव यांची रवानगी फौज सुद्धां करनाटकांत करून आम्ही माघारीं पुण्याकडे फिरून आलों. राजश्री मल्हारजी होळकर व गंगाधर यशवंत देशांत आले. राजश्री दमाजी गायकवाड यास यावयाचीं पत्रें पाठविलीं आहेत; अविलंबेच येतील. हे त्रिवर्ग व आम्ही मिळून जो मनसब पुढील कर्तव्याचा तो केला जाईल. निजामअल्लीखानाचे चित्तांत अद्यापि कुरूष आहे. ते विषयींची ही पैरवी होणें ती होईल. मुख्य गोष्ट तुम्ही व नारोशंकर एकविचारें राहून हिंदुस्थानचा बंदोबस्त करून किल्ले कायम राखणें. बहुत काय लिहिणें. रवाना चंद्र ७ साबान. * सारांश सांप्रत हिंदुस्थानचा सर्व अखत्यार तुम्हांवर आहे. कळेल तसा बंदोबस्त रक्षणें.

(पुढें चालू)

---

* हा पुढील मजकूर रघुनाथराव पेशवे यांचे स्वदस्तुरचा आहे.

आहेत व त्यांची मातुश्री गोपिकाबाई ही केवळ बायकोमाणूस असून तिजमध्यें स्त्रीजातीप्रमाणें दूरदृष्टी व पोंहोच कमी आहे, याकरितां माधवराव लहान आहेत तोंवर त्यांस वागविण्याचा मान आपला आहे. परंतु माधवरावाचे मर्जीचा कल मातुश्रीचे आज्ञेप्रमाणें वागण्याकडे विशेष होता यामुळें एके दिवशीं दरबारांत त्यांचे व रघुनाथराव यांचे कज्म्जास्त बोलणें होऊन उभयतांमध्यें बेबनाव झाला.

(मागील पृष्ठावरून समाप्त.)

बादजबरसात सरकारच्या फौजा व मल्हारबा येतीलच. निजामअल्ली सुरळीत असला तर खासास्वारी येईल; परंतु निजामअल्लीचा भरंवसा नाही. एकदा यांत शाहासुजातदौला हरएक मोघल (सुद्धा) याचे उरावर येतो तर हा केवळ मारला जाईल. आपणासही कांहीं नफा होईल; परंतु सांप्रतचा काळ विलक्षण आहे याजमुळें मनसबा साधणें संकट दिसतें. असो; होणें तें होतच आहे. आपण पुरुष प्रयत्नास चुकूंनये यास्तव चारी राजकारणें सुजातदौला व पातशाहा यांजकडे करणें. होता होईल तें खरें. पातशाहा व सुजातदौला हे अबदाल्लीस कंटाळले असले तरी जाट वगैरे लाहान मोठे हातीं घेऊन अबदाल्लीचें पारपत्य करावें असा मनसोबा होईसा आहे; परंतु शाहाणपणानें व तजवीजीनें केला पाहिजे. यास्तव नारो शंकर व तुम्ही एकविचारें होऊन हरएक पैरवी करणें. वरचेवर लिहीत जाणें. सर्व यखत्यार सांप्रत तुम्हां दोघांवर आहे. केदारजी शिंदे व माहादजी शिंदे यांसही पाठविलें आहे. यांचेंही स्वरूप राखून उपयोग पडेल तें करावें. सांप्रत शिंद्याचे जागीं तेंच आहेत. हे विनंती.

मोर्तब.

हें वर्तमान गोपिकाबाईस कळल्यावर त्यानीं रघुनाथराव यास राज्यकारभारांतून काढून टाकण्याचा निश्चय केला आणि आपलें मसलतींत त्रिंबकराव मामा पेठे, बाबूराव फडनवीस, बापूजी नाईक व पिराजीनाईक निंबाळकर व कितीएक लष्करी सरदार व मुत्सद्दी घेतले. आणि हुजुरातीची दरोबस्त फौज अनुकूल करून घेऊन दादासाहेब व त्यांचे पक्षाचे सरदार व मुत्सद्दी यांस कैद करण्याचा घाट घातला; आणि माधवराव पेशवे यांजकडून रघुनाथराव यांची नेमणूक रद्द करवून त्यांचे जागीं त्रिंबकराव मामा पेठे यांस मुख्य कारभारी नेमाविलें. आणि गोपाळराव पटवर्धन यांस नायब दिवाण नेमवून त्यांचे हाताखालीं बाळाजी जनार्दन भानू (नाना फडनवीस) व हरीपंत फडके यांच्या योजना करविल्या.

ह्या गोष्टी घडल्या त्या वेळेस विठ्ठल शिवदेव उत्तर हिंदुस्थांत होते सबब रघुनाथराव यानीं त्यांस तावडतोब पुण्यास परत येण्याविषयीं निकडीचें पत्र पाठविलें. तें पत्र विठ्ठलराव यांस पोंहचतांच, त्यानीं आपले पुत्र शिवाजी विठ्ठल यांस ग्वाल्हेर येथें ठेविलें आणि आपण नारो शंकर राजेबाहादर यांस बरोबर घेऊन ऐनबरसातींत निघाले ते २७ दिवसांत पुण्यास येऊन दाखल झाले.

तेथें रघुनाथराव व त्यांचे तर्फेचे मुत्सद्दी व सरदार यांस कैद करण्याचा विचार अगदीं बेतावर आला होता. विठ्ठलराव पुण्यास आल्याचें वर्तमान गोपिकाबाई व त्यांचे पक्षाची मंडळी यांस लागतांच त्यांनीं त्यांसही कैद करण्याचा बेत केला. सुदैवेंकरून त्यांचे दोस्त मल्हारराव होळकर हे त्यावेळेस पुणें येथें होते. त्यांस वरील बेताची खबर लागतांच ती त्यानीं विठ्ठलराव यांस कळवून लागलेंच आपले जाहगिरीचे गांव वाफगांव येथें त्यांस पाठवून दिलें. विठ्ठलराव यांचे सुचनेवरून नारो शंकर राजेबाहादर हेही निघून मालेगांवास गेले. त्याचप्रमाणें रघुनाथरावही तावडतोब निघून विंचुरास गेले. त्यांचे मागून दिवाण

सखाराम बापू बोकील, नीळकंठ माहादेव पुरंदरें, जीवनराव केशव खासगीवाले, अंताजी माणकेश्वर यांचे पुत्र वगैरे मंडळी विंचुरास गेली. नंतर नारो शंकरही मालेगांवाहून तेथें आले. त्या वेळेस विठ्ठल शिवदेव यांचे कनिष्ठ पुत्र मल्हारराव व नरसिंगराव हे विंचूर येथेंच होते. त्यांनीं रघुनाथराव दादासाहेब यांस सामोरे जाऊन समारंभानें गांवांत आणिलें; आणि आपले वाड्यांत सर्वांचे राहण्याची सोय करून त्यांची योग्य रीतीनें बरदास्त ठेविली. रघुनाथराव दादासाहेब व सखारामबापू यांनीं विठ्ठल शिवदेव यांस विंचुरास ताबडतोब येण्याविषयीं वाफगांवास निरनिराळीं पत्रें पाठविलीं. पैकीं रघुनाथराव दादासाहेब यांजकडून आलेलें पत्र खालीं दाखल केलें आहेः——

श्रीशंकर.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री विठ्ठल शिवदेव स्वामी गोसावी यांसिः—

पोष्य रघुनाथ बाजीराव. नमस्कार बिनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणें. विशेष; आम्ही दरमजल विंचूरास दाखल झालों. सखाराम भगवंत तेथें आले. कित्येक विचार केले आहेत तरी तुम्ही दर मजल येणें. वरकड सविस्तर मल्हारराव व नरसिंगराव लिहितालि त्याजवरून कळेल. सखारामपंतांनींही पत्र लिहिलें आहे. त्यावरून कळेल. जाणीजे. चंद्र १३ सफर गुरुवार तिसरा प्रहर हे विनंति.

विठ्ठल शिवदेव विंचुरास आल्यावर राघोबादादा यानीं सर्व सरदार व मुत्सद्दी यांच्या सल्लयानें कलमजारी करून सरकारची खासगत फौज वाढविली. त्या कामास पुष्कळ खर्च लागला. तो विठ्ठल शिवदेव यानीं कर्ज काढून पुरविला. नंतर राघोबादादानीं पुढें काय काय करावें व कसें वर्तावें यांविषयीं वर लिहिलेले नांवांचे सरदार व मुत्सद्दी यांनीं एकविचारें एक यादी

तयार केली आणि ती त्यांजकडे गुजराऊन तिचे प्रत्येक कलमावर त्यांचे कबुलायतीचे शेरे लिहून घेतले. ती अस्सल यादी खालीं दाखल केल्याप्रमाणें:—

यादी येणेंप्रमाणें स्वामीनीं करार करून द्यावयाची ऐकिली पाहिजे. छुरसंन् सलाससीतैन मया व आलफ् चंद्र १७ सफर.

१. श्रीमंत राजश्री भास्करराव आम्हास धनी द्यावें. दिवाणगिरी निळकंठ महादेव पुरंदरे यांस सांगावी. सखारामपंत यांणीं कारभार करावा. हाल्लीं नारो शंकर व जीवनराव केशव हजर झाले. पुढें सरदार इकडे जे येतील त्याशीं मुलूक लावून द्यावे. त्यांच्या सनदा द्याव्या. हुजूरांत खाजगी याशीं माहाल नेमून द्यावें. किल्ले देशचे व गंगथडीचे सुटतील ते जिमे लावून द्यावे. येणेंप्रमाणें करार करावा.

१. दिवाणगिरीचा कारभार निळकंठ माहादेव यांजकडे; त्याचा कारभार सखाराम भगवंत यांजकडे. करार. वरकड लिहिल्याप्रमाणें कलमें करार. किल्ले सुटतील. ते निळकंठ माहादेव व सखाराम भगवंत यांचे विचारें जिमेस लावून घ्यावें. किल्ले त्र्यंबक व धोडप खाजगत चिरंजीवाकडे ठेवावे. येणेंप्रमाणें करार. चिरंजीव भास्करराव यांचे पायाशीं एकनिष्ठेनें वर्तणें व दौलत वाढेल तें करावें व ते थोर झालीयावर त्याचे आज्ञेंत वर्तावें. तोंपर्यंत अखत्यार तुझांवर; व तुम्ही लिहिल्याप्रमाणें सदर्हु प्रमाणें कलम करार.

२. स्वामीनीं उमेद धरल्यावर पुण्याहून श्रीमंत बाई व रावसाहेब येतील. मोहो घालतील तो पडो न द्यावा ते आम्हांविषयीं आड घालतील जे याशीं हातीं द्यावे ती गोष्ट न ऐ-

२. उत्तम आहे त्यानीं आम्हांस सोडिलें असतां त्यांची भीड आम्हास काय आहे?

कावी ये विषयीं बेलभंडार शपथपूर्वक द्यावा.

३. आम्हां चौघांस फारकती द्यावी जे तुम्हाकडे सरकारचे लचांड कांहीं नाहीं. तुम्ही हरएक मनसब केला तरी तुम्हाकडे हरामखोरी नाहीं. तुमची कर्जवामें सरकारांत बुडाली आहेत. दौलत उभी राहिली तरी तुमचें तुम्ही घेणें अशी पत्रें.

१ निलकंठ महादेव.
१ सखारामपंत.
० अंताजीपंताचें पुत्र.
१ नारोशंकर.
१ विठ्ठल शिवदेव.
१ जीवनराव केशव.
—
५

३. येणेंप्रमाणें साहा पत्रें कलम रुजूं पांचा जणास द्यावी पत्रें १.

४. मुरादखान यांजला बोलावून त्यांची आमची गांठ घालून ऐक्यता करून द्यावी करार १.

४. येणेंप्रमाणें कलम करार. मुरादखानाची व चौघा सरदाराची गांठ घालून दिली जाईल. करार.

५. राजश्री जानोजी भोंसले याजला पत्रें पाठवून बोलावून त्याची व आमची गांठ घालून ऐक्यता करून द्यावी. तुम्ही व आमचे सरदार एक होऊन राज्याचा बंदोबस्त करावा या

५. चिरंजीव भास्करराव व तुम्ही व सर्व आम्हाकडील सरदार मिळून राज्याचा बंदोबस्त करणें ह्मणोन पत्र घेणें व यादीप्रमाणें पत्रें दिलीं जातील. करार.

प्रमाणें सागावें. अणि सरदार आले त्याशीं पत्रें व माहालकरी यांस पत्रें यादी तयार करून रवाना करावी. कलम.

येणें प्रमाणें पांच कलमें करार. नर्मदा तीरी खाजगत खर्चाकडे करार. उत्तर तीर पंधरा कोस व दक्षिणतीर पंचवीस कोस दोन्ही डोंगरांतील मुलूख खाजगत खर्चाकडे ठेवावा. वरकड मुलूख सुटेल तो चिरंजीव भास्करराव याचे सनदे प्रमाणें वाटून घ्यावा. सर्व बंदोबस्त करून खाजगत खर्चाचे जाहागिरींत उपद्रव कांहीं लागूं देऊं नये. येणेंप्रमाणें करार. चित्रभानूनाम संवत्सरे, भाद्रपद वद्य २ रविवार, उत्तरा भाद्रपदा नक्षत्र. येणें प्रमाणें करार.

तूर्त खर्चास रुपये २५००० पंचवीस हजार खाजगत खर्चास सर्वांनीं मिळून घ्यावे. पुढें आठ चार दिवस राहिले तरी दररोज हजार रुपये खर्चास देत जावे.

नवमी रविवारा अलिकडे पंचवीस रोख द्यावे.

ह्या यादींत लिहिल्याप्रमाणें जातीचे तैनातीबद्दल व फौजेचे खर्चाबद्दल पूर्वी जो नक्त ऐवज मिळत होता त्याचे ऐवजीं त्या सरदारांनीं मुलुक घेण्याचा ठराव करून घेऊन त्याप्रमाणें दादासाहेब यांजपासून सनदाही करून घेतल्या. त्यावेळेस विठ्ठल शिवदेव यांस जातीची तैनात व फौजेचा खर्च याबद्दल सालीना आकार रुपये १६८५००० च्या मुलुकाच्या सनदा मिळाल्या.

नंतर एकत्र झालेले सरदार व मुत्सद्दी यांणीं आपापल्या फौजा वाढविल्या. आणि राघोबादादानीं आपले मदतीस येण्याविषयीं निजामाचा औरंगाबाद येथील सुभेदार मुरादखान याजबरोबर बोलणें लावून असा ठराव केला कीं, त्यांचे मदतीनें संपूर्ण पेशवाईंत आपला श्रेष्ठ अ-

धिकार स्थापन झाल्यावर आपण निजाम यास दौलताबाद, शिवनेरी, (जुन्नर) अहमदनगर, आणि अशेरी येथील किल्ले व त्या शिवाय सालीना एक्कावन लाख रुपयांचे उत्पन्नाचा मुलूख द्यावा. हा ठराव मुरादखानानें निजाम यांस कळविल्यावर, त्यानीं प्रथम त्या सरदारास वीस हजार फौजेनिशीं राघोबादादा यांचे मदतीस ताबडतोब जाण्याविषयीं हुकूम केला, आणि आपणही हैदराबादेहून पन्नास हजार फौजेनिशीं निघून त्याच कार्यास्तव औरंगाबादेकडे कूच केला. त्या हुकूमाबरहुकूम मुरादखान हा लवकरच वीस हजार फौजेनिशीं विंचुरास येऊन पोहोंचला. नंतर राघोबादादांकडील एकत्र जमलेल्या फौजेनें पुण्याकडे कुच केला. पुण्याहूनहीं माधवराव पेशवे त्र्यंबकमामा पेठे, गोपाळराव पटवर्धन, प्रतिनिधी वगैरे सरदार व हुजुरात बरोबर घेऊन निघाले ते घोडनदीजवळ हिंगणी गांवापर्यंत येऊन पोहोंचले. तेथे दोन्ही फौजांची गांठ पडतांच लढाईस सुरुवात झाली. परंतु राघोबादादाकडील फौजेची संख्या फारच मोठी असल्यामुळें पेशव्यांचे फौजेचें तिजपुढें कांहींच चालेनासें होऊन शेवटीं तिची दाणादाण झाली, आणि राघोबादादांकडील सरदारांनीं माधवराव पेशवे अंबारींत असतां तो हत्ती वळवून आपले छावणींत नेला. त्या प्रसंगीं माधवराव यानीं मोठ्या चातुर्यानें व दक्षतेनें वर्तन केलें. तें असें कीं त्या दुर्घट प्रसंगीं लीनता धरणें यांतच आपला तरुणोपाय आहे असें त्यांस वाटल्यावरून ते आपले चुलते यांस हात जोडून म्हणाले कीं, " काका ! आपल्या घरांत कलह असणें हें आपल्या नाशाचें कारण आहे. याकरितां मी आपले ताब्यांत राहातों. आपले मर्जीस येईल त्याप्रमाणें आपण राज्यकारभार चालवावा " हें त्या तरुण पेशव्याचें समयोचित भाषण राघोबादादांस फार चांगलें वाटून त्यानीं त्यास आपले स्वाधीन ठेविलें. परंतु त्यास बहुमान देण्यांत बिलकुल कसर केली नाहीं. हें माधवरावाचें वर्तन गोपाळराव पटवर्धन व

प्रतिनिधी यांस नीट न वाटून त्यांनीं त्यांस विचारलें कीं "आतां आमची काय वाट ?" तेव्हां माधवराव यानीं त्यांस सांगितलें कीं "या प्रसंगीं आपला प्राण व हुरमत वांचविण्यास्तव तुह्मीं कोठें तरी निघून जावें; योग्य समयीं मी तुह्मांस विसरणार नाहीं." त्यावरून ते उभयतां लागलेंच निघून हैदराबादेस गेले. त्यांची निजामानें मोठी खातर करून त्यांस आपले आश्रयाखालीं ठेवून घेतलें. निजामअल्ली पन्नासहजार फौजेनिशीं राघोबादादांचे मदतीस्तव येण्यास निघाले असें वर लिहिलें आहे. त्यांची व राघोबादादा यांची पांडेपेडगांव येथें भेट झाली. तेथें उभयतां चुलतेपुतण्ये यांचा समेट झाला असें निजामांस कळल्यावरून त्यानीं छद्मीपणानें राघोबादादास असें बोलून दाखविलें कीं "तुमचें ऐक्य झालेलें पाहून मला मोठा संतोष वाटतो."

ही भेट झाल्यानंतर राघोबादादा माधवरावसाहेबांसह पुण्यास निघून गेले व निजामही हैदराबादेस गेले.

राघोबादादानीं राज्यकारभार हातीं घेतल्यावर आपल्या कारकीर्दीची पहिली तजवीज म्हणून निळकंठ माहादेव पुरंदरे यांस मुख्य दिवाणागिरीचीं वस्त्रें दिलीं; सखाराम भगवंत बोकील यांस नायबदिवाण केलें; मोरो बाबूराव फडणवीस यांस दूर करून त्यांचे जागीं चिंतो विठ्ठल राईरकर यांस नेमिलें; विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांस आमात्य पद दिलें; आणि प्रतिनिधीचें पद आपला पुत्र भास्करराव यास दिलें;परंतु भास्करराव बाल्यावस्थेंत होता म्हणून नारो शंकर राजेबाहदर यांस त्याचे मुतालीक नेमिलें.

गोपाळराव पटवर्धन निजामाकडे जाऊन मिळाले म्हणून राघोबादादा यानीं त्यांच्या मिरज येथील किल्यावर मोर्चे लाविले गोपाळरावाचे वडील गोविंद हरि पटवर्धन हे मिरजेस होते. त्यानीं

तो किल्ला न घेण्याविषयीं राघाबादादाची मोठी मिनतवारी केली. परंतु ती न मानून त्यानीं त्या किल्ल्यावर हल्ला केला. तेव्हां गोविंद हरी यानीं विठ्ठल शिवदेव विंचूरकर व नारो शंकर राजेबाहादर यांस भेटून त्यांचे मार्फत राघोबादादास अशी विनंति केली कीं, " आह्मांस मंगळवेढ्यास पोहोंचतें करावें आणि जरी किल्ला घेतला तरी त्याची खराबी करूं नये. " ही विनंति राघोबादादानीं मान्य केल्यावर विठ्ठल शिवदेव यानीं त्यांचे आज्ञेवरून गोविंद हरीस मंगळवेढ्यास पोहोंचतें केलें. नंतर राघोबादादानीं तो किल्ला घेऊन त्यांत व गांवांत लूट केली. माधवराव पेशवे यांस प्रतिबंधांत ठेवून राघोबादादा स्वतंत्रपणें राज्यकारभार करूं लागल्यापासून त्यानीं जें जें वर्तन केलें तें तें मोठ्या सरदारांपैकीं कोणासही आवडलें नाहीं. आणि हाल्लीं मिरजेस लूट केल्यामुळें तर सर्वांसच नाखुषी प्राप्त होऊन कितीएक सरदार हैदराबादेस निघून गेले. त्याचप्रमाणें प्रख्यात धनाजी जाधव याचा नातू रामचंद्रराव जाधव हाही निजामाकडे जाऊन मिळाला. या वर लिहिलेल्या दरोबस्त सरदारांस आपलेंसें करून घ्यावें म्हणून निजामाचे दिवाण विठ्ठल सुंदर यानीं त्यांस मोठमोठ्या नेमणुका करून देऊन त्यांची मोठी खातर केली. त्याचें कारण पुढें लिहितों.

पानिपतचे लढाईचा घातकारक परिणाम झाल्यानें मराठे लोकांचे अति मोठें नुकसान होऊन त्यांस मोठी खिन्नता प्राप्त झाली होती. ही संधी पेशव्याचें राज्य नष्ट करण्यास उत्तम आहे असें निजामाचे त्या वेळचे दिवाण विठ्ठल सुंदर* यांस वाटल्यावरून

---

* हे दक्षणी यजुर्वेदी ब्राम्हण असून मुळचे संगमनेर येथील राहाणारे होते. ते प्रतिनिधीचे मुतालिक यमाजी गमाजी यांचे आप्त होते. निजामाचे दरबारांत कित्येक वर्षेपर्यंत त्यानीं ने-

(पुढें चालू)

त्यानीं दक्षण महाराष्ट्र देशांतील पटवर्धन वगैरे सरदार यास फितविण्याचा उद्योग चालूं केला होता. इतक्यांत माधवराव पेशवे आपल्या चुलत्याच्या आधीन झाल्यामुळें त्यांचे पक्षाचे कितीएक सरदार आपोआप निजामाकडे जाऊन मिळाले. खेरीज मुरादखानाबरोबर राघोबादादानीं ठराव केल्याप्रमाणें पेशव्यांचे कामगारांकडून फक्त दौलताबादचा किल्ला मात्र निजामाचे ताब्यांत गेला. बाकीचे किल्ले व मुलूख देण्याविषयीं राघोबादादाचा हुकूम झाला असतांनाही त्यांच्या कामगारांनीं तो अमलांत आणिला नव्हता. ह्या गोष्टीमुळें पुण्यावर स्वारी करण्यास कारण होऊन दिवाण मौसुफ् यानीं ती करण्याविषयीं निजामास हुरूप आणिला. तेव्हां हैदराबाद येथें लढाईची तयारी होऊं लागली. ती झाल्यावर निजामाचे लष्कराचा पुण्याकडे कूच झाला. या मोहिमेवर खुद्द निजाम व त्यांचे दिवाण विठ्ठल सुंदर हे जातीनें आले असून त्यांच्या बोलावण्यावरून नागपूरचे जानोजी भोंसले हेही १५००० स्वारांनिशीं आले होते. शिवाय राघोबादादाशीं नाखूष होऊन गेलेले पटवर्धन वगैरे सरदारही आपापल्या फौजांनिशीं निजामा बरोबर आले होते.

निजाम आपल्यावर एवढ्या तयारीनें स्वारी करील असें राघोबादादा यांस मुळींच वाटलें नव्हतें; म्हणून त्यानीं त्याजबरोबर युद्ध करण्याची तयारी केली नव्हती. त्यांजवळ जरी मल्हारराव होळकर व दमाजी गायकवाड वगैरे आपापल्या फौजांनिशीं

(मागील पृष्ठावरून समाप्त)

कीनें नौकरी केल्यावर निजामअली यानीं सन १७६२ चे जून महिन्यांत आपला भाऊ सलाबतजंग यास कैदेत ठेविलें त्यावेळेस त्यांस (विठ्ठल सुंदर यांस) दिवाणाचे पदवीस चढविलें. पुढें सन १७६२ चे अखेरीस मुरादखानानें राघोबादादा बरोबर जो ठराव केला तेणेंकरून विठ्ठल सुंदर यांचे मनांत मुरादखानाविषयीं द्वेषभाव उत्पन्न होऊन त्यानीं पेशव्याबरोबर नवीन युद्ध उपस्थित करण्याचा विचार काढिला.

होते तरी त्यांची एकंदर फौज निजामाचे जबरदस्त फौजेपुढें टिकण्याजोगी नव्हती. म्हणून त्यानीं असा बेत केला कीं निजामाचा सामना न करितां त्यांस इकडून तिकडे व तिकडून इकडे असें चक्कर देऊन आणि संधी साधेल त्या वेळेस त्यांच्या फौजेच्या लाहान टोळ्यावर हल्ले करून त्या माराव्या आणि त्यांच्या शहरांवर हल्ले करून व त्यांचे मुलकांत लुटपाट करून त्यांस बेदम करावें; म्हणजे ते कंटाळतील, आणि कांहीं तरी तह करून माघारे जातील. हा बेत सिद्धीस नेण्यास्तव राघोबादादा यानीं माधवराव पेशवे यांसहीत पुण्याहून कूच केला आणि प्रथम निजामासमूर युद्धास गेल्याचें मीष करून नंतर त्यास झुकांडी दिली आणि औरंगाबादेस जाऊन तें शहर लुटण्याचा इरादा केला. परंतु तें शहर कोटबंदी असल्यामुळें तो इरादा शेवटास गेला नाहीं. मग जानोजी भोंसले निजामाचे मदतीस आले होते, सबब त्यानीं (राघोबादादानीं) त्यांचे मुलुकांत शिरून त्यांचा मुलुक लुटतां लुटतां मलकापूर शहरापासून साठ हजार रुपये खंडणी घेतली. नंतर त्यानीं निजामाचे मुलुकांत शिरून त्यांत मोठी लूट केली, आणि शेवटीं हैदराबाद लुटण्याचें इराद्यानें त्याजवर चाल केली. परंतु त्या शहरास मजबूत व उंच असा कोट असल्यामुळें त्यांत त्यांस प्रवेश करितां आला नाहीं. तत्रापि त्या कोटा बाहेरच्या पेठेपासून त्यानीं एक लाख ऐंशी हजार रुपये खंडणी बद्दल घेतले.

निजामअल्ली प्रथम आपले फौजेनिशीं राघोबादादा यांचें पाठीस लागले; परंतु शेवटीं त्यांस त्यांचा पाठलाग करण्याचा त्रास आला, तेव्हां त्यानीं प्रतिक्रिया करण्यास्तव पुणें शहर जाळून टाकण्याचा निश्चय करून त्याजवर चाल केली. हें वर्तमान ऐकून पुण्यांतील लोकांस मोठें संकट प्राप्त झालें. भग आपला बचाव करण्यास्तव किती एक गृहस्थ आपापलीं कुटुंबें व मौल्यवान् चीजवस्त बरोबर घेऊन आश्रयाकरितां आसपासच्या मजबूत

पाहाडी किल्ल्यांत जाऊन राहिले व कितीएक तर कोंकणांत निघून गेले. निजामअल्ली आपले लष्करसुद्धां पुण्यास येऊन पोंहचल्यावर त्यांनीं त्यांतील पुष्कळ वाडे जाळून टाकिले व कितीएक मोडून टाकिले; परंतु ज्या वाड्यांचे बचावाबद्दल त्यांस रोख ऐवज मिळाला त्या वाड्यास त्यांनीं उपसर्ग लाविला नाहीं; बाकी त्या शहराचा बराच भाग लुटून फस्त केला—पेशव्यांचे शनिवारचे वाड्याबद्दल नारो आपाजी तुळसीबागवाले यानीं पैसा भरिल्यामुळें त्याचा बचाव झाला. नंतर निजामअल्ली यानीं पुरंदर तालुक्यांत जाऊन पुष्कळ मुलुक उद्वस्त केला, आणि पर्जन्यकाळ समीप आला सबब बेदरास परत जाण्याचा विचार केला; परंतु त्यांजबरोबर जानोजी भोसला होता त्यानें त्यांस औरंगाबाद येथें राहाण्याची सल्ला दिल्यावरून त्यानीं त्या शहराकडे कूच केला.

राघोबादादा हैदराबादेहून पुण्याकडे परत येत असतां, रस्त्यांत त्यांचे गुप्त बातमीदारांनीं त्यांस पुणें लुटलें गेल्याची खबर कळविली. ती ऐकून उभयतां चुलतेपुतण्ये यांस अत्यंत दुःख झालें. आणि माधवराव पेशवे यांस गहिंवर येऊन ते राघोबादादांस म्हणाले कीं, " काका! मोघल लोकांनीं पानिपत येथें आपल्या लोकांचा जो नाश व पराजय केला व ज्याचे कारणानें वडील नानासाहेब यांचा अकालीं देहांत झाला त्याचें स्मरण तुम्हांस नाहीं काय? त्याबद्दल मोघल लोकांचा सूड उगविण्याचा यत्न करणें सोडून देऊन आपण आपसांत तंटे करण्यांत निमग्न झालों आहों याचा विचार करा; स्वर्गीं वडील आपल्यास काय ह्मणतील इकडे दृष्टी द्या; अजून तरी आपसांतील वैमनस्य विसरून प्रथम आपले राज्यास जेणेंकरून मजबुती येईल ती गोष्ट करा. नंतर मोघलांचा सूड घेण्यास उद्युक्त व्हा. " या बोलण्यानें आपण केलेल्या तंट्याबद्दल राघोबादादा यांस वाईट वाटून त्यांचे मनांत माधवराव यांजबरोबर समेट करण्याचा विचार घोळू

लागला आणि पटवर्धन वगैरे जे आपले पदरचे सरदार व मानकरी आपले द्वंद्वामुळें निराधार होऊन केवळ आपले प्राण व हुरमत वांचविण्यास्तवच निजामाकडे मिळाले होते त्यांस परत बोलाविण्याची गोष्ट माधवरावानीं काढतांच राघोबादादानीं त्या गोष्टीस तात्काळ मोकळ्या मनानें रुकार दिला. राघोबादादा म्हणाले कीं, "रावसाहेब! तू चिंता करूं नको. ईश्वरकृपेनें उद्भवलेल्या संकटाचें निवारण झालें म्हणजे इतर सर्व गोष्टींची व्यवस्था मी तुझ्या इच्छेप्रमाणें करीन."याप्रमाणें उभयतां चुलतेपुतण्ये यांजमध्यें समजुतीचें भाषण होऊन समेट होतांच माधवराव पेशवे यांनीं पटवर्धन वगैरे जे आपले सरदार निजामाकडे गेले होते त्यांस परत येण्याविषयीं विश्वास येण्याजोग्या मनुष्यांबरोबर पत्रें पाठवून त्यांत अभयवचन व आश्वासन लिहून कळविलें. हीं पत्रें त्या सरदारांस पोंहतांच ते सर्व आपापल्या फौजांनिशीं पेशव्यांचे लष्करास परत आले. ते निजामांचे लष्करांतून जातांच त्यांचे लष्कर हलकें झालें. मग राघोबादादानीं माधवराव यांचे सल्ल्यानें जे इतर मराठे सरदार निजामांकडे होते त्यांस त्यांपासून फोडण्याचा उद्योग चालविला असतां, निजामांकडून जानोजी भोंसले याचा व्हावा तसा फायदा न झाल्यामुळें तो आपल्यास अनुकूल होईल असें त्यांस वाटलें. त्यावरून त्यानीं त्याशीं बत्तिस लाख रुपयांचा मुलुक देण्याचा गुप्त ठराव करून त्यास आपलेसें करून घेतलें.

निजामाचें लष्कर औरंगाबादेकडे चाललें असें वर लिहिलें आहे. तें गोदावरीचे किनाऱ्यावर पोंहोचतांच, निजामअल्ली आपल्या कितीएक सरदारांनिशीं त्या नदीपलीकडे उतरून गेले. त्यांचें बाकीचें लष्कर त्यांचे दिवाण विठ्ठल सुंदर यांचे हाताखालीं त्या नदीचे दुसरे कांठीं राक्षसभुवन गांवाजवळ तळ देऊन पडलें होतें. निजामअल्ली पार उतरून जातांच जानोजी भोंसले हा आपले फौजेस खर्चास वेळेवर ऐवज मिळत नाहीं असा बाहाणा करून त्या दिवाणापासून दूर उतरला. जानोजी अलग झाला ही जशी राघो

बादादास निजामांचे लष्करावर हल्ला करण्यास एक सूचनाच झाली. त्यावेळेस राघोबादादा मोठ्या अंतरावर होते.त्यांनीं आपल्या दरोबस्त फौजेनिशीं मोठाल्या मजला करीत सत्वर जाऊन विठ्ठल सुंदर यांचे फौजेवर हल्ला केला. तेव्हां लढाई सुरूं झाली. त्या लढाईस मराठे लोक राक्षसभुवनची लढाई असें म्हणतात. व कोणी कोणी तेरदळची लढाई असेंही म्हणतात. ती सतत दोन दिवस मोठ्या निकरानें झाली. दुसऱ्या दिवशीं असें झालें कीं, राघोबादादा व सखारामबापू हे उभयतां एक हत्तीचे अंबारींत बसलेले असून आपल्या फौजेस लढण्यास उत्तेजन देत असतां मोघल फौजेनें त्यांच्या फौजेस मागें हटविलें आणि त्यांच्या हत्तीस गराडा घालून तो ताब्यांत घेतला. त्याचप्रमाणें पेशव्यांचा जरीपटक्याचा हत्तीही मोघल फौजेनें घेरिला. परंतु तो हत्ती जरीपटक्याचें निशाण तोंडांत धरून आणि आपल्या घेरणारांस लाताडून तेथून झपाट्यानें निघाला तो मागें माधवराव पेशवे यांच्या तंबूजवळ येऊन पोंहोचला. तो हत्ती पाहून आपल्या फौजेची दाणादाण झाली असें माधवराव यांस वाटलें आणि ते जरी राघोबादादा यांच्या प्रतिबंधांत होते तरी राघोबादादाचा मोड झाल्यानें त्यांस आनंद होणारा नव्हता, कारण राघोबादादाचा जो मोड झाला तोच आपला मोड झाला असें त्यांस वाटलें. मग त्यानीं आपल्या वरील पाहाऱ्याचे सरदारास जवळ बोलाविलें आणि राघोबादादाचा मोड झालासा दिसतो असें त्यांस कळवून "आझूनही तुम्ही मला कैदेंतच ठेवणार कीं काय?" असें त्यांस विचारिलें. त्या सरदारानें जबाब दिला कीं "आपण कैदेंत आहां असें कोण मानील? आपण या प्रसंगीं सुचेल ती तजवीज करावी. तळावर असलेली सर्व फौज आपल्या आज्ञेची वाट पाहात आहे." त्याजवर माधवराव म्हणाले कीं "बरें तर तयार व्हा" इतकें बोलून त्यानीं कंबर बांधिली. मग त्या सरदारानें हिकडून तिकडून सरासरी

पांच हजार स्वार जमा केले, आणि त्यानीं बसण्यास्तव मागितलेला घोडा हाजीर करितांच माधवराव त्याजवर बसले. इतक्यांत एका स्वारानें असें वर्तमान आणिलें कीं, राघोबादादास मोघल लोक कैद करून घेऊन चालले आहेत. मग काय विचारावें ? माधवरावांचे अंगांत अत्यंत वीरश्री उत्पन्न झाली. आणि त्यानीं त्या फक्त पांच हजार स्वारांनिशीं मोघलाचे फौजेंत दोन्ही बाजूंनीं रस्ता कापीत जाऊन रण तुंबळ केलें. हें पाहून त्यांची जी हुजुरात त्यापूर्वी प्रसन्न अंतःकरणेंकरून लढली नसून पळण्याचे बेतांत होती तिला धैर्य येऊन तिनेंही पुन्हा झपाट्यानें हल्ला केला. तेव्हां त्या बाजूस मोघलांचा अगदीं मोड झाला. नंतर माधवरावानीं खुद्द विठ्ठल सुंदर यांस गांठून त्यांजवर हल्ला केला आणि त्यांस कत्तल करून त्या बाजूचे फौजेचा अगदीं मोड केला. याप्रमाणें दोन्ही बाजूंनीं मोघलांचा अगदीं मोड होऊन पळ निघाला. तत्रापि पळणारे मोघल लोक राघोबादादाचा हत्ती बरोबर घेऊन चालले होते. त्यांजवर माधवराव यानीं हल्ला करून तो हत्ती हिसकावून घेतला आणि त्यांचा पाठलाग करून त्यांची मोठी कचल उडविली. नंतर माधवराव राघोबादादाचा हत्ती घेऊन जयश्रीनें आपल्या तंबूस परत आले. ते व राघोबादादा हत्तीवरून खालीं उतरून तंबूंत बसल्यावर, राघोबादादा सखारामबापूकडे पाहून म्हणाले कीं "बापू ! आज मी कृतकृत्य झालों. रावसाहेब अल्पवयस्क असल्यामुळें कांहीं दिवसपर्यंत राज्य संभाळावें असें माझें मनांत होतें; परंतु तो तें संभाळील अशी माझी आज पूर्ण खातरी झाली आहे, कारण, तो येथें नसतां तर आज आपली काय वाट झाली असती बरें ? परंतु कसें झालें तरी आपलें तें आपलेंच." इतकें बोलून ते माधवराव यांस म्हणाले कीं "मुला ! तू आतां आपलें राज्य संभाळण्यास योग्य झालास यांत

बिलकूल संशय नाहीं. याकरितां मी आतां तुझ्या प्रतिबंधांत राहातों आणि तूं तें आपले इच्छेप्रमाणें चालीव." त्याजवर माधवराव यानीं जबाब दिला कीं "काका! आपण रिकामे झाला असें समजूं नये. मला जरी आपण मुखत्यारी देत आहां, तरी मी आपल्या सल्लयाशिवाय कांहीं करणार नाहीं." असें बोलून सर्वांचे देखत माधवरावानीं राघोबादादाचे पायांवर मस्तक ठेविलें.

वर लिहिलेली लढाई सुरू झाली त्यावेळेस निजाम व त्यांचे दिवाण यांच्या दरम्यान गोदावरी नदी वाहत असल्यानें निजाम यांस त्या दिवाणास मदत करितां आली नाहीं, यामुळें त्याचा अगदीं मोड झाला. तो पाहून निजामानीं औरंगाबादेकडे कूच केला; परंतु पेशव्याकडील सरदार लागलेच ती नदी उतरून त्यांच्या पाठीस लागले. पाठलाग करणाऱ्या फौजेच्या आघाडीस विठ्ठल शिवदेव विंचूरकर हे आपल्या टोळीनिशीं होते. विठ्ठल सुंदर यांजबरोबर झालेल्या लढाईत ज्या हत्तीवरील अंबारींत राघोबादादा बसले होते तो हत्ती मोघल लोकांनीं ताब्यांत घेऊन आपल्या लष्करांत चालविला असतां, त्या प्रसंगीं त्यांस सोडवून आणण्यास्तव आपल्या हातांनीं कांहींच पराक्रम झाला नाहीं हें आपल्या शिपाईगिरीस मोठें लांछन आहे. हालीं ईश्वरकृपेनें त्या गोष्टीचा बदला घेण्याची वेळ आली आहे. अशा वेळेस आपण मोघल लोकांस हात दाखविला नाहीं तर आपण कांहींच केलें नाहीं असें त्यांस (विठ्ठल शिवदेव यांस) वाटून त्यांचे मनांत पराकाष्ठेची वीरश्री उत्पन्न झाली. मग त्यानीं झपाट्यानें जाऊन निजामांचे स्वारीस औरंगाबाद शहराचे अलीकडचे बाजूस गांठिलें, आणि आपल्या एकदिलाच्या पांच हजार मानकरी स्वारांनिशीं निजामांचे हत्तीवर अत्यंत वेगानें हल्ला केला. तेव्हां मोठी चकाचकी उडाली. तींत पहिल्या सपाट्यास विंचूरकर यांचे सुमारें दोन हजार मानकरी पडले; परंतु त्यानीं निजामांकडील मोघल स्वार पांच हजारांवर

कत्तल केले: आणि विठ्ठलराव यानीं स्वतः बाकीच्या मानकऱ्यांनिशीं निजामाचे हत्तीपर्यंत रस्ता कापीत जाऊन त्या हत्तीस गराडा घातला. तो पाहून निजामाकडील एक मोघल सरदारानें मोठ्या झपाट्यानें गराडा घालणारांवर पडून निजामाचा हत्ती सोडविण्याचा यत्न केला. तेव्हां लढाई मोठ्या त्वेषानें व दृढनिश्चयानें झाली. ती चालली असतां निजामांचे माहातानें त्यांच्या अंबारीचा हत्ती मोठ्या षिताबीनें त्या लढाईंतून पळवून नेला. तो पकडण्याकरितां मल्हारराव होळकर जे नुकतेच आपल्या स्वारांनिशीं पुढें वाढून आले होते, त्यानीं बहुत प्रयत्न केला. परंतु त्या कोटबंदी शहराच्या वेशीचा दरवाजा जवळ असल्यामुळें माहातानें तो हत्ती लागलाच आंत नेला. नंतर निजामांचे हुकुमानें मोघल लोकांनीं तो दरवाजा तत्काळ बंद केला. परंतु कोटाबाहेरील मोघल फौजेची मोठी कत्तल उडून त्यांपैकीं थोडे स्वार मात्र पळून गेले.

याप्रमाणें निजामअल्लीस औरंगाबाद शहराचा आश्रय मिळाला; परंतु पेशव्यांची संपूर्ण फौज मागून येतच होती. ती आल्यावर आपला टिकाव लागणार नाहीं असें त्यांनीं पाहून राघोबादादा यांजकडे तहाचें बोलणें बोलण्यास वकील पाठविला, आणि तह करण्याचें ठरल्यावर आपण स्वतः त्यांच्या भेटीस गेले. त्या भेटींत ते राघोबादादास ह्मणाले कीं "ही लढाई दिवाण विठ्ठल सुंदर यानींच उपस्थित केली. मजकडे कांहीं नाहीं. मला तर त्याबद्दल फार वाईट वाटतें." असें बोलून त्यानीं राघोबादादाची मर्जी प्रसन्न करून घेतली. नंतर तह झाला. राघोबादादा यानीं पूर्वी जो एकावन लक्षाचा मुलुक त्यांस देऊं केला होता त्यांपैकीं त्यानीं दाहा लक्षाचा मुलुक मात्र यावेळेस त्यांस दिला. पुढें एक दोन रोजांनीं राघोबादादानीं जानोजी भोंसले यांस भेटीस बोलाविलें आणि उघड दरबारांत निजामाकडे

मिळाल्याबद्दल त्यांस दोष देऊन नंतर त्यांस कराराप्रमाणें बत्तीस लाख रुपयांचे मुलुकाची सनद दिली. याप्रमाणें या लढाईचा शेवट लागल्यावर, निजामअल्ली हे हैदराबादेस परत गेले, व राघोबादादा माधवरावासह पुण्यास आले.

माधवरावसाहेब दौलतीचा सर्व अधिकार चालवूं लागल्यावर पटवर्धन यांचा मिरजेचा किल्ला पूर्वी राघोबादादांनीं घेतला होता तो त्यानीं पटवर्धन यांस परत दिला; सखारामबापू बोकील यांस त्यांचे हुद्यावर कायम केलें; प्रतिनिधीचें पद मूळच्या प्रतिनिधीस परत दिलें; चिंतो विठ्ठल यांजकडून फडनवीसाचा हुद्दा घेऊन तो बाळाजी जनार्दन भानू (नाना फड्णवीस) यांस दिला. पेशजी राघोबादादाचा मुक्काम विंचूर येथें असतां त्यांनीं आपले पक्षाचे सरदार लोकांस फौजेचे गुजाऱ्याकरितां नक्त ऐवज देण्याचे मोबदला मुलुकाच्या निरनिराळ्या सनदा करून दिल्या असें वर लिहिलें आहे. त्या सनदांप्रमाणें मुलुक तोडून दिले असतां सरकारचा मुलुक पुष्कळ जाऊन सरकार खासगीस फार थोडा मुलुक राहील; शिवाय इतर सरदारांबरोबर पटवर्धन व रास्ते यांस निरनिराळ्या मुलुकांचे सरंजाम करून देणें जरूर आहे; असें माधवराव यांस वाटल्यावरून त्यानीं राघोबादादा व सखारामबापूसह मुत्सद्दी मंडळ यांजबरोबर त्या गोष्टीबद्दल वाटाघाट केली. शेवटीं सर्वांचे विचारें असें ठरलें कीं, विंचूर मुक्कामीं राघोबादादानीं करून दिलेल्या सनदांत जे सरंजाम लिहिले आहेत त्यांपैकीं एक चतुर्थांश सरकारांत परत घ्यावा. परंतु हा ठराव विठ्ठल शिवदेव हे कदाचित कबूल करणार नाहींत असें माधवराव यांस वाटल्यावरून त्यानीं त्यांची समजूत करण्याविषयीं राघोबादादा यांस विनंति केली. त्याप्रमाणें राघोबादादानीं विंचूरकराची समजूत केल्यावर माधवराव यानीं सर्व सनदवाल्या सरदारांच्या मुलुकांचें चतुर्थांश खालसा करून बाकी तिजाई मुलुकांच्या न-

वीन सनदा त्यांस करून दिल्या. त्याच वेळेस त्यानीं पटवर्धन व रास्ते यांस ही फौजेच्या गुजाऱ्याकरितां मुलुक तोडून देऊन नवीन सनदा दिल्या. पटवर्धन यांचे सनदेंत विंचूरकराप्रमाणें स्वार व घोडे व इतर जंगी सामान त्यानीं (पटवर्धन यानीं) जवळ बाळगावें अशी शर्त लिहिलेली होती. ही व्यवस्था सन १७६२ इसवी सालचे आखेरीस झाली. त्यावेळेस विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांस जो मुलुक मिळाला, त्यापैकीं खानदेशांत धुळें, सोनगरी वगैरे माहाल; गंगथडींत पाटोदें परगणा वगैरे; गुजराथेंत उरपाड माहाल; माळव्यांत सिहुर, आष्टें, दुराया, देवीपुरा आणि इछावर हे पांच माहाल; व ग्वालेरीनजीक भीतरवार वगैरे पांच माहाल, असा होता.

संनसत्राशें चौसष्ट सालीं कर्नाटकांत हैदरअल्ली याजवर स्वारी करण्याचा बेत ठरून पुण्यास फौजेची तयारी चालली. त्यावेळेस मल्हारराव होळकर हे पेशवे यांच्या बोलावण्यावरून पंधरा हजार स्वारांनिशीं पुण्यास येऊन पोंहोचले. थोरले माधवराव हे स्वभावानें फार खुनशी असत. विठ्ठल शिवदेव हे दादासाहेब यांचे पक्षांतील असल्यामुळें त्याणीं विंचूर येथें दादासाहेबांची उभारणी करून त्यांचे तर्फेनें आपल्याबरोबर लढाईहीं केली होती; ही गोष्ट त्यांच्या (माधवराव पेशवे यांच्या) मनांत राहून कधीं तरी त्यांची मानखंडना करावी असा त्यांचा इरादा होता. एके दिवशीं असें झालें कीं, विंचूरकर यांचे कितीएक मानकरी मैदानांत घोडे फिरवीत असतां मौज पाहाण्यास्तव तेथें पेशवे यांचेही कांहीं मानकरी गेले. आणि कांहीं क्षुल्लक कारणावरून तंटा उपस्थित झाला. तेव्हां उभयपक्षांचे मदती करितां उभयपक्षांचे दोस्त धांवून गेले आणि लाहानशा लढाईसारखाच प्रकार झाला. हें वर्तमान माधवराव पेशवे यांचे कानावर जातांच त्यांस संताप येऊन त्यांनीं एकदम हुकूम केला कीं, विठ्ठलराव यांस कैद करून त्यांचा गोट लुटावा. ही खबर विठ्ठल शिवदेव यांस कळतांच

प्रथम त्यानीं दादासाहेबांस चिठ्ठीनें सविस्तर मजकूर लिहून कळविला. त्याचें उत्तर त्यांस दादासाहेबांकडून स्वदस्तुरचें आलें तें असें:—

श्रीशंकर.

राजश्री विठ्ठलराव उमदेतुलमुल्क बाहादर स्वामी गोसावी यांस.

विनंति उपरी. चिठ्ठी पाठविली ती पावली. किरकोळ कज्यासाठीं उदासपणें लिहिलें, तरी असें तुम्हींही न करावें व चिरंजीवही करणार नाहींत. किरकोळ मजकुरासाठीं वाईट दाखवावें हें काय? असे कज्यासाठीं दुतर्फैही सांड असावी. मी चिरंजीवासही सांगून पाठवितों. तुम्हींही उदास न होणें हे विनंति.

तथापि रावसाहेबांचा स्वभाव आग्रही असल्यामुळें दादासाहेबांचे सूचनेप्रमाणें होईल असें विठ्ठलराव यांस वाटलें नाहीं. सबब त्यानीं दुसरे दिवशीं मागील चार घटिका रात्रीं स्नान करून आपले कुलस्वामींची पूजा केली; आणि घरची सर्व शेवटची निरवानिरव करून पांच हजार फौजेनिशीं कंबरबंदी केली; आणि आपले दिवाण चिमणाजी खंडेराव व फौजेवरील मुख्य अधिकारी आबूराव विठ्ठल वगैरे यांस बोलावून सांगितलें कीं "मित्रहो! बाजीरावसाहेब यांचे अव्वली पासून आजपर्यंत मी सरकारचाकरी एकनिष्ठेनें करून हुरमत मिळविली; परंतु हाल्लींच्या मालिकांच्या मनांत दादासाहेब पेशवे यांचे संबंधानें मजविषयीं संतोष नाहीं असें दिसतें, कारण, माझी हुरमत खालीं करण्याची तजवीज त्यानीं सुरू केली आहे. अशा बिकट प्रसंगीं अब्रूरक्षणाकरितां तरवार करून कचाळ होऊन जाणें हेंच बेहत्तर आहे. हा प्रसंग कदाचित आतां टळेल तरी मालिकांचे मनांत मजविषयींचा किंतु दृढ झाल्यामुळें कधीं तरी

असा प्रसंग येणारच आहे. याजकरितां हा शेवटचा प्रसंग समजून कोणीही घोड्यावर न बसतां सर्वांनीं उभे राहून समय येईल तेव्हां शिपाईगिरींत कत्तल होण्यास तयार राहावें व मीही तसें करण्याचा निश्चय केला आहे." असें बोलून त्यांनीं तत्काळ घोड्यावरून उडी टाकिली आणि हातांत तरवार घेऊन ते पुढील प्रसंगाची वाट पाहात उभे राहिले. तें पाहून त्यांचे सर्व सरदार व मानकरी यांनींही तसेंच केलें. याप्रमाणें सर्व गोट आवळून उभे राहिले, म्हणजे पांच हजार लोक एक दिलाचे कट्टे लढणारे नग्न तरवारी चमकावीत येणाऱ्या प्रसंगाची मार्गप्रतिक्षा करीत राहिले. ही गोष्ट मल्हारराव होळकर यांस समजतांच त्यानीं लगबगीनें जाऊन माधवराव पेशवे यांस विनंती केली कीं, "हाल्लीं करनाटकांत स्वारी जावयाची आहे आणि त्यासाठीं फौजेची तयारी चालू असून आपण मध्येंच हें काय आरंभिलें आहे? विठ्ठल शिवदेव हे पुरातन नौकर मोठे मर्द माणूस, यांजविषयीं ही अशी विपरीत बुद्धि आपण कां धरिली ? त्यांचे पांच हजार लोक नाहींसे होण्यास आपल्या फौजेंतील दाहाहजार लोक बळी पडले पाहिजेत असें आपण पक्कें समजावें. पंधरा हजार लोकांची आहुती होईल तेव्हांच विठ्ठल शिवदेव स्वाधीन झाले तर होतील. त्यांतून अशा जवांमर्द पुरुषाचा आपणास कंटाळाच आला असेल तर त्यांस एखाद्या मोहिमेवर पाठवावें. ही उद्यां कर्नाटकची स्वारी होणार आहे. तींत त्यांस एखादें जोखिमेचें काम सांगावें, म्हणजे झालें." होळकरानीं सांगितलेली गोष्ट माधवरावांच्या मनांत तत्काळ बिंबली. मग माधवरावसाहेब होळकर यांस म्हणाले कीं, "तुम्हीं म्हणतां हें ग्रहण करण्यास योग्य आहे; परंतु विठ्ठल शिवदेव हे अगदीं विचलून गेले आहेत. त्यांची समजूत आतां कशी होईल ?" त्याजवर होळकर म्हणाले कीं, "त्याबद्दल आपण बिलकूल फिकीर करूं नये. मी स्वतः त्यांजकडे जातों आणि त्यांची समजूत करून त्यांस हुजूर घेऊन

येतों." नंतर होळकरानीं विठ्ठलराव यांजकडे जाऊन प्रथम त्यांजकडून आपले तरवारीस म्यान करविलें आणि "हा अविचार काय ?" असें बोलून त्यांचा हात धरिला आणि "श्रीमंताकडे चला जाऊं" असें बोलून त्यांस हुजूर नेलें. तेथें विठ्ठलराव यांनीं हात जोडून श्रीमंतांस विनंती केली. ते म्हणाले "राव साहेब ! मी शाहूमाहाराजापासून नानासाहेब पेशवे यांचे आखेरीपर्यंत जी नौकरी केली तींत हुरमतीशिवाय दुसरें कांहींच मिळविलें नाहीं. असें असून आतां स्वामींचे मनांत मजविषयीं असंतोष उत्पन्न झाला असेल तर मला संतोषानें निरोप द्यावा. मी जाण्यास सिद्ध आहे. परंतु ज्या अर्थीं मला आतां सरकारचरणांशिवाय दुसऱ्याची ताबेदारी कर्तव्य नाहीं त्या अर्थीं मी कोठें जरी गेलों तरी आपले आयुष्याचे बाकीचे दिवस परलोकसाधनांत घालविण्या खेरीज मी दुसरें कांहींच करणार नाहीं, अशी आपण खात्री बाळगावी." ह्या विनंतीचा परिणाम असा झाला कीं, विठ्ठलराव यांचे स्वामीनिष्ठेविषयीं माधवराव पेशवे यांची पूर्ण खात्री झाली आणि पूर्वीं योजिलेल्या तजविजीबद्दल त्यांस पश्चात्ताप होऊन त्यांनीं विठ्ठलराव यांस जवळ बोलाविलें आणि त्यांची चांगली खातरजमा करून त्यांस होळकराबरोबर त्यांचे गोटास परत पाठऊन दिलें. गोटांत गेल्यावर पांचहजार लोकांनीं आपापल्या कंबरा सोडून ढालतरवारी खालीं ठेविल्या.

कर्नाटकप्रांतीं हैदरअल्ली फार उपद्रव करितो ही गोष्ट श्रीमंतांस पूर्वींच समजली होती, म्हणूनच खासास्वारी लढाईस जाण्यास तयार झाली. माधवराव पेशवे खुद्द, सखारामबापू कारभारी, विठ्ठल शिवदेव सेनापती, मल्हारराव होळकर व पटवर्धन आदिकरून सरदार कर्नाटकचे स्वारीस निघाले. कर्नाटकांत शिरल्याबरोबर पेशव्यांनीं प्रथम धारवाडचा किल्ला स्वाधीन करून घेतला. पेशव्यांचें लष्कर कर्नाटकांत आल्याची खबर ऐकतांच हैदरअल्लीनें आपल्या

फौजेची तयारी करून पेशव्याशीं लढाई करण्यास्तव अनवती गांवानजीक अगम्य जंगलांत छावणी केली. ही त्याची फौज बरीच मोठी होती; तींत वीस हजार कडे स्वार व चाळीस हजार पायदळ होतें. त्यापैकीं कवाईत शिकलेले असे पलटणी वीस हजार शिपाई होते. शिवाय त्या छावणीचें स्थळ जंगलांत अडचणीचे ठिकाणीं असल्यामुळें बहुत करून अजिंक्य होतें. ही सर्व खबर हेरांनीं माधवरावसाहेब यांस कळविल्यावर त्यांनीं सखारामबापू यांस एकांतांत विचारिलें कीं, "आतां पुढें काय विचार करावा ? सखारामबापुनीं असें उत्तर दिलें कीं, "हाल्लीं आपल्याजवळ थोडी फौज असून ती कवाइती फौजेचा सामना करण्याजोगी नाहीं. याकरितां आपण पुण्यास परत जाऊन कवाइती फौज वाढवावी आणि लढाईचे पोक्त सरंजामानिशीं परत येऊन नंतर हैदरअल्लीवर स्वारी करावी असें मला वाटतें." ही सल्ला माधवराव पेशवे यांस नीट वाटली नाहीं, कारण हैदर चालून आला असतां माघारें जाणें हें त्यांच्या मतें अत्यंत लज्जास्पद होतें. नंतर विठ्ठल शिवदेव जे पुरातन व मोठे मर्द माणूस आणि पुष्कळ प्रसंग पाहिलेले असें त्यांनां वाटत होते त्यांस त्यांनीं त्या मसलतींत घेऊन तोच प्रश्न त्यांस केला. तेव्हां विठ्ठलराव यांनीं सांगितलें कीं, "शत्रू समीप आला असून मागें फिरणें हें शूर पुरुषास योग्य नव्हे; याकरितां आपण पुढें चाल करून मोठ्या हिम्मतीनें व हिकमतीनें निकराची लढाई करावी असें मला वाटतें." ही सल्ला पोक्त व सयुक्तिक होती सबब माधवराव पेशवे यांस पसंद पडली.

दुसरे दिवशीं पेशवे संपूर्ण फौजेनिशीं कूच करून हैदरअल्लीचे छावणीजवळ जाऊन पोहोंचले. तेव्हां लढाई सुरू झाली. तींत पेशव्यास आपल्या काबूंत आणण्यास्तव हैदरानें बऱ्याच हिकमती चालवून पाहिल्या; परंतु तरुण पेशवा मोठ्या दक्षतेनें युद्ध चालवीत असल्यामुळें हैदराच्या त्या सर्व हिकमती व्यर्थ होऊन

शेवटीं त्यास आपली सुटका करण्यास्तव बेफायदाचे ठिकाणीं लढाई करण्यास उभें राहाणें प्राप्त झालें. तत्रापि त्याच्या कवाईती तोफखान्याचे मारामुळें पेशव्याकडील बरेच स्वार पडले. तें पाहून विठ्ठल शिवदेव यांस अत्यंत त्वेष चढला. मग त्यानीं आपले दिवाण व सेनापती व फौजेंतील मोठमोठाले पराक्रम केलेले मानकरी व शिलेदार पाग्ये यांस बोलावून असें बोलून दाखविलें कीं, " आजपर्यंत मी बाजीरावसाहेब व चिमाजी आपा या प्रथम कारकीर्दीत आणि त्यांच्या मागून नानासाहेब, भाऊसाहेब, आणि दादासाहेब या दुसऱ्या कारकीर्दीत, आपले जिवाकडे न पाहतां मोठमोठाल्या दुर्धट प्रसंगीं स्वामी सेवेंत अंतर केलें नाहीं, यामुळें मजवर त्या पुरुषांचा अत्यंत लोभ राहिला. हाल्लीं माधवराव साहेब हे धनी असून त्यांची मजवर मोठी इतराजी झाली आहे, या करितां या समयीं जिवाची आशा न धरितां मोठा पराक्रम करून जय मिळवावा, नाहीं तर लढाईंत मरून जावें हेंच उचीत आहे. हें समजून माझे खरे सोबती असतील त्यांनीं निष्कपट मनानें मला साथ द्यावी. " हे आपल्या मालिकांचे निर्वाणीचे शब्द ऐकून सर्व जमलेल्या योध्यांनीं एक विचारें जबाब दिला कीं, " तात्यासाहेब ! आम्हां विषयीं आपण मनांत बिलकूल संशय आणूं नये. आह्मीं ज्या पेक्षां सर्व प्रसंगां करितां मुळींच आपले साथी झालों आहों त्यापेक्षां आम्हीं सर्व कत्तल झाल्याशिवाय आपल्या बालागास धक्का लागूं देणार नाहीं ही आपण खातरी बाळगावी. " असें बोलून सर्वांनीं " जय नरहरी " असा जैजैकाराचा शब्द मोठ्यांनीं केला.

नंतर विठ्ठल शिवदेव यांनीं हैदरअल्लीचे तोफखान्यावर झपाट्यानें चाल केली. तेव्हां शत्रूच्या कवाइती तोफांच्या माऱ्यामुळें वाटेंत त्यांतून पुष्कळ वीर व मानकरी पडले. तत्रापि त्या गोष्टीची परवा न बाळगितां, विठ्ठल शिवदेव यानीं त्या तोफखान्यावर एकदम हल्ला केला; आणि त्यांस पेशव्यांकडून मागून

उत्तम प्रकारची मदत झाल्यामुळें त्यांनीं गोलंदाज यांस कत्तल करून सर्व तोफा ताब्यांत घेतल्या. हैदरअल्लीचा तोफखाना विंचूरकर यांचे हातीं लागतांच पेशव्यांचे स्वारांपुढें त्याचा टिकाव न लागून त्याचा लवकरच मोड झाला. विठ्ठल शिवदेव यांचें हें अनिवार्य धारिष्ट पाहून माधवराव साहेब अत्यंत चकीत झाले आणि त्यांजविषयीं मल्हारराव होळकरांनीं जें कांहीं त्यांस सांगितलें होतें त्याबद्दल त्यांची पूर्ण खातरी झाली. रात्रीं सर्व तळांवर फौजा जमल्या नंतर माधवराव पेशवे यांनीं स्वतः विठ्ठल शिवदेव यांच्या गोटांत जाऊन "आज माझा जय मुख्यत्वें करून तुमच्याच पराक्रमा मुळें झाला आहे व त्याबद्दल मी तुमचा मोठा आभारी झालों आहें" असें त्यांस कळवून, समागमें आलेले सरदार व मुत्सद्दी यां मध्यें त्यांची मोठी प्रशंसा केली. त्याजवर विठ्ठल शिवदेव यांनीं जबाब दिला कीं "ह्या गोष्टी स्वामींच्या पुण्यप्रतापामुळेंच होत आहेत. आजच्या प्रसंगांत मी स्वामीचरणा संनीध धारातीर्थी कत्तल झालों आसतों तर या देहाचें सार्थक झालें असतें; कारण, तेणेंकरून आपल्या मनांत मजविषयीं आलेला किंतु सर्व दूर झाला असता." त्याजवर रावसाहेब पेशवे यांनीं विठ्ठलराव यांची पुष्कळ तऱ्हेनें खातरजमा केली आणि ज्या तोफा त्यांनीं (विठ्ठलराव यांनीं) त्या लढाईंत जिंकून घेतल्या होत्या त्या तोफां पैकीं दोन मोठ्या तोफा त्यांस बक्षीस दिल्या. त्या तोफा विठ्ठल शिवदेव यांनीं आणून आपल्या अणकईच्या किल्ल्यावर ठेविल्या. या प्रमाणें जो हैदरअल्ली मोठ्या घेखीनें पेशव्याबरोबर लढाईस आला होता त्याचा या मोहिमेंत अगदीं नक्षा उतरून तह करण्याविषयीं त्याजला माधवराव यांस विनंति करणें भाग पडलें. नंतर माधवराव यांनीं राघोबादादा यांस बोलावून तह करण्याचा सर्व अधिकार त्यांजकडे सोंपून दिला; कारण, त्या मोहिमेवर स्वतः जाण्याचा दादासाहेब यांचा मानस असतानां माधवरावसाहेब त्यांच्या इच्छेविरुद्ध गेले होते, यामुळें दादासाहेब नाखुष होऊन, तबियत नीट नाहीं अशा बाहाण्यानें

पुण्याहून निघून नाशिकाजवळ आनंदवल्ली येथें जाऊन राहिले होते. तथापि माधवरावानीं थोर मनानें त्या लढाईचा शेवट लावण्यास्तव त्यांस पाचारण केल्यामुळें त्यांची मर्जी प्रसन्न होऊन ते माधवराव यांचे लष्करांत सत्वर जाऊन पोहोचले. नंतर हैदर अल्लीच्या वकिलांनीं त्यांजपाशीं तहाचें बोलणें सुरू करून स्वारी खर्चाबद्दल म्हणून बत्तीस लाख रुपये पेशव्यांस देण्याचें कबूल केलें. परंतु राघोबादादांनीं त्याजकडून आणखी दोन कलमें कबूल करविलीं. तीं अशीं कीं हैदरअल्लीनें मुरारराव घोरपडयाचा घेतलेला मुलुक परत द्यावा, आणि सावनूरच्या नबाबापासून खंडणी वगैरे कांहीं न घेतां त्यास स्वतंत्र राहूं द्यावें. ह्या शर्तीं हैदरअल्लीनें कबूल केल्यावरून तह झाला. एवढा मोठा जय झाला असून राघोबादादांनीं त्या हलक्या शर्तींनीं तह केला तो माधवरावसाहेब यांस आवडला नाहीं. परंतु त्यांनीं तो करण्याचा अधिकार राघोबादादाकडे सोंपिला होता सबब त्यांस त्या कामीं उदासीन राहणें प्राप्त झालें. ही गोष्ट सन १७६४ चे आखेरीस झाली. या जयामुळें माधवरावसाहेब यांची मोठी कीर्ति होऊन हैदराबादचे निजाम व कर्नाटकांतील सर्व राजे त्यांची जरब बाळगूं लागले.

प्रकरण ७ वें.

विठ्ठल शिवदेव यांचे चरित्राचा शेवट.

माधवराव पेशवे व राघोबादादा कर्नाटकची स्वारी करून पुण्यास परत आल्यावर एके दिवशीं माधवराव साहेब राघोबादादा यांस म्हणाले कीं "काका! येथें फौजा जमल्या आहेत. त्या रिकाम्या ठेवणें प्रशस्त नाहीं; त्यांस कांहीं तरी कामगिरीवर

पाठविलें पाहिजे. याकरितां मला असें वाटतें कीं पूर्वीं पानिपतचे लढाई नंतर उत्तर हिंदुस्थानांतील आपल्या मुलुकाचा बंदोबस्त करण्यास्तव विठ्ठल शिवदेव हे माहादजी सिंदे यांस बरोबर घेऊन ग्वालेरीस गेले होते; परंतु कांहीं कारणास्तव ते दक्षिणेस सत्वर परत आल्यामुळें, तिकडील पुष्कळ बंदोबस्त होणें तसाच राहिला आहे. याकरितां आपण ह्या सर्व फौजेनिशीं ग्वाल्हेरीस जाऊन राहिलेला सर्व बंदोबस्त करावा. मींच स्वतः तुम्हांबरोबर यावें, परंतु एक तर येथें कोणी खाशापैकीं राहिलें पाहिजे. दुसरें, तुम्हीं पुरातन माहितगार असल्याकारणानें तिकडील बंदोबस्त जसा तुमच्या हातानें होईल तसा माझ्या हातानें होणार नाहीं. याकरितां तुम्हींच तिकडे जावें. मल्हारजी होळकर माळव्यांत असून तेही तिकडील पुरे माहितगार आहेत व विठ्ठल शिवदेव हे तुम्हांबरोबर येतीलच. " हें माधवरात्र साहेबांचें बोलणें दादासाहेबांनीं मान्य करून उत्तर हिंदुस्थानांत जाण्याची तयारी चालविली. इतक्यांत एक क्षुल्लक कारणावरून जानोजी भोंसले यांशीं बेबनाव होऊन नागपुरावर चढाई करणें प्राप्त झालें. तेव्हां दादासाहेबांनीं माधवराव पेशवे यांस सांगितलें कीं "उद्भवलेल्या मोहिमेवर तुम्ही जावें. तिचा निकाल झाला म्हणजे मी तीच फौज घेऊन पुढें जाईन." ही गोष्ट माधवराव यांस पसंद झाली आणि ते विठ्ठल शिवदेव वगैरे कितीएक सरदारांस बरोबर घेऊन नागपुरावर गेले. परंतु जानोजी भोंसल्यानें पेशव्याशीं सामना न करितां कितीएक वेळां लढाईचे प्रसंग टाळिले आणि लढाईनें आपलाच नाश होईल असें शेवटीं त्यास वाटल्यावरून त्यानें पेशव्याबरोबर तह केला. या तहानें पेशव्याचा फारसा फायदा झाला नाहीं.

या तहाचें वर्तमान दादासाहेब यांस समजतांच, ते पुण्याहून सडच्या स्वारीनिशीं निघून माधवराव वऱ्हाडांतून परत येत असतां मार्गांत त्यांस भेटले. नंतर दादासाहेब हे विठ्ठल शिवदेव वगैरे

सरदार यांस बरोबर घेऊन उत्तर हिंदुस्थानाकडे गेले. आणि माधवराव पेशवे लड्या स्वारीनिशीं पुण्यास परत आले.

दादासाहेब यांची स्वारी माळव्यांत गेल्यावर माहादजी शिंदे व मल्हारराव होळकर आपापल्या फौजांनिशीं त्यांच्या लष्करांत येऊन मिळाले. नंतर दादासाहेब यांची स्वारी पुढें ग्वाल्हेरीकडे चालती झाली.

मार्गांत कांहीं एका कारणावरून त्यांची महादजी शिंदे यांवर अत्यंत इतराजी होऊन शिंदे यांस शासन होण्याचा रंग दिसूं लागला. या गोष्टीची खबर स्वारींतील अखबारनवीस यांनीं पुण्यास माधवराव पेशवे यांस तावडतोब कळविली. रावसाहेब हे सूज्ञ व दूरदृष्टि असल्यामुळें त्यांस वाटलें कीं "आजपर्यंत आपले कार्याकरितां शिंदे यांचे कुळाचे सर्व पुरुष रणांत बळी पडले. फक्त माहादजी एवढाच आतां उरला आहे. तोहि होतकरू असून स्वामिभक्त आहे. यास्तव माहादजी शिंदे याचा बचाव होईल अशी तजवीज हरतऱ्हेनें करावी." म्हणून त्यांनीं मल्हारराव होळकर व विठ्ठल शिवदेव यांस स्वदस्तुरची चिठ्ठी पाठविली. शिंदे यांचे सुदैवानें ती चिठ्ठी उभयतांस वेळेवर जाऊन पोहोंचली. नंतर उभयतांनीं दादासाहेब यांची बहुत प्रकारें समजूत घालून माहादजी शिंदे यांचा बचाव केला.

दादासाहेब यांची स्वारी ग्वाल्हेरीस पोहोंचली तों त्यांस असें कळून आलें कीं, गोहदचे जाट राण्यानें पेशवे सरकारचा पुष्कळ मुलुक दाबिला आहे, व युक्तियुक्तीनें पेशवे सरकारचा अंमल त्या प्रांतांतून अजीबाद उठवून देण्याचा विचार केला आहे. ह्या दगाबाजी बद्दल त्या राण्याचें योग्य पारिपत्य करावें म्हणून रघुनाथ राव यांनीं गोहद किल्ल्यास तत्काळ वेढा घातला. तेव्हां लढाई सुरू झाली. तींत पेशव्यांकडील पुष्कळ लोक पडले. परंतु किल्ला सर झाला नाहीं. इतक्यांत त्यासंबंधीं विठ्ठल शिवदेव यांस माधवराव पेशवे यांजकडून पत्रें आलीं तीं अशीं:—

॥ श्री ॥

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री विठ्ठल शिवदेव उमदे तुलमुल्क बहादूर स्वामी गोसांवी यांशीं:—

पोष्य माधवराव बल्लाळ प्रधान. नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणें. विशेष. सांप्रत तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी ऐसें नसावें. गोहदेवर हल्ला केला परंतु हल्ला मुरडला गेला. फार जाया जखमी जाहले म्हणून परभारें वर्तमानें येतात, परंतु तुम्ही कांहींच लिहिलें नाहीं, अपुर्व आहे. अतःपर याचे, व तिकडील मनसुबीयाचे व राजकारणें कोण कोठील आलीं याचे, पुढें मनसुबा करणें कोणता तो सविस्तर लिहिणें जाणिजे. चंद्र १५ रज्जब सुरसन सबासीतैन मयाव अलफ. बहुत काय लिहिणें. तुम्ही दोन चार पत्रें पाठविलीं तीं पावलीं. आलीकडे पत्र येत नाहीं, तरी सविस्तर वृत्त लिहिणें हे विनंती. पैवस्ती चंद्र २ रमजान. नजीक राईरातगड प्रांत नरवर.

---

(२)

॥ श्री ॥

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री विठ्ठलराव शिवदेव उमदेतुलमुल्क बहादूर स्वामी गोसावी यांशीं:—

पोष्य माधवराव बल्लाळ प्रधान. नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहित जाणें. विशेष. सांप्रत तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. गोहदेस मोर्चे दिले होते तेथील तहाचा विचार कसा ठरला तें व हिंदुस्थानचें वर्तमान सविस्तर

लिहून पाठविणें. जाणिजे. चंद्र १४ सफ्फर सुरसन सबांसीतैन मयावअल्लफ. बापूची रवानगी सत्वर करितां म्हणोन पूर्वी लिहिलें होतें, त्यास अद्याप बापू आले नाहींत, तरी सत्वर त्यांस हुजूर पाठविणें. वरकड त्या प्रांतींचे मनसब याचा प्रकार कसकसा आहे तो लिहिणें. हे विनंती. पैवस्ती चंद्र २५ रज्जब सन सबांसीतैन. मुक्काम शिखरोंदा प्रांत शिकरवरी.

---

(३)

॥ श्री ॥

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री विठ्ठलराव शिवदेव स्वामी गोसावी यांशीं:—

पोष्य माधवराव बल्लाळ प्रधान. नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणें. विशेष. सांप्रत तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तरी ऐसें नसावें. सर्वदां आपणाकडील व तिकडील मनसुबीयाचे कर्तव्यतेचें बारीक मोठें वर्तमान लिहीत जावें. प्रस्तुत मुक्काम कोठें आहे; गोहदेचा तह जाहलाच असेल; पातशाहा कोठें आहेत; सुजा उदवला व गाजुदीखान कोणते मनसुबीयांत आहेत; फिरंगी कोठें आहेत, जाट व रोहिले कोणे उपद्व्यापांत पुढें विचार काय करितात. तें बारीक मोठें वर्तमान लिहीत जाणें. जाणिजे. चंद्र २२ रब्बिलाखर सुरसन् सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणें हे विनंती.

या संधीस मल्हारराव होळकर यांची प्रकृति बिघडली होती म्हणून ते हवा बदलण्यास्तव ग्वाल्हेरीनजीक आलमपूर माहालीं आपल्या अमलांत थोडे दिवसांची रजा घेऊन गेले; पण भांडेरी मुक्कामीं त्यांची प्रकृति अत्यंत बिघडून ते आलमपुरास पो-

होंचल्यावर लवकरच त्यांस देवाज्ञा झाली. ही गोष्ट सन १७६६ इसवी सालीं झाली. त्यासंबंधीं विठ्ठलराव यांस माधवराव पेशवे यांजकडून पत्र आलें तें असें:—

॥ श्री ॥

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री विठ्ठलराव शिवदेव उमदेतुलमुल्क बहादूर स्वामिगोसावी यांशीं:—

पोष्य माधवराव बल्लाळ प्रधान. नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणें. विशेष. मल्हारजी होळकर यांस वैशाख शुद्ध ११ रोजीं देवाज्ञा झाली. याचें वर्तमान येथें आलें. श्रवण होऊन चित्तास परम खेद झाला. मातबर सरदार मोठे दावाचे होते. ईश्वरइच्छेस उपाय नाहीं. त्यांचा भावी पदार्थ तसा होताच, परंतु तीर्थरूपांचें जाणें हिंदुस्थानास होऊन परस्पर भेटी होऊन, मल्हारबाचा काळ झाला. त्याचा सुकृतांशच. असो; तुम्ही हिंदुस्थानाचे अमीरांचे व सार्वभौमाचें मनसुबीयास माहीत. तिकडील मनसुबे तुमचे हातें झाले व पुढेंही उमदे उमदे मनसुबे करून हिंदुस्थानाचा बंदोबस्त करावा ही तुमची उमेद आहेच, तदनुरूप तीर्थस्वरूपास विनंती करणें. जें उचित करणें तें करालच व ज्यांत लौकिकास्पद तेंच तीर्थरूपाचे आज्ञेप्रमाणें करून दाखवाल. विशेष काय लिहिणें. तुम्हाकडील पत्रें येत नाहीं हें काय? हिंदुस्थानचें वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. रवाना चंद्र ९ मोहोरम्. बहुतकाय लिहिणें हे विनंति. पैवस्ती चंद्र १० सफर संनसबांसितैन.

मल्हारराव होळकर यांचे मरणानें दादासाहेब यांस व त्यांचे मित्र विठ्ठल शिवदेव यांस अत्यंत दुःख झालें; आणि त्यांची उमेद खचून जाऊन झपाटयानें लढाई चालविणें त्यांजकडून झालें

नाहा. गोहदचा राणा याजकडून तहाचें बोलणें बोलण्यास वकील येतांच त्याजपासून त्यानीं तीन लाख रुपये खंडणी घेऊन लागलाच वेढा उठविला. नंतर त्यांनीं विठ्ठल शिवदेव यांजबरोबर मल्हारराव होळकराचा नातू मालोजी होळकर यास सरदारीचीं वस्त्रें पाठवून दिलीं. त्यावेळेस ग्वाल्हेरीचे किल्ल्यांत विठ्ठल शिवदेव यांचें शिबंदीचें ठाणें होतें. त्यांस पुष्कळ दिवस फौजेचें देणें देण्यास पैसा मिळाला नव्हता. सदर्हू मागील बाकी मिळण्यास्तव त्या लोकांनीं विठ्ठलराव यांस मोठा तगादा केला. हें वर्तमान दादासाहेब यांस समजल्यावर त्या लोकांचें देणें आदा व्हावें आणि विठ्ठल शिवदेव हे देण्यांतून मुक्त व्हावे ह्मणून त्यानीं त्यांस उचाडभरोली माहाल हा नवीन सरंजामास लावून दिला, आणि त्यांस त्या माहालाची सनद करून देऊन सर्व बखेडा मोडून टाकिला.

नंतर विठ्ठल शिवदेव यांस ग्वाल्हेरीस बंदोबस्त करण्यास ठेवून दादासाहेब यांची स्वारी दक्षिणेस परत आली. ह्या वेळेस माधवरावसाहेब पेशवे कर्नाटकांतील स्वारी यशानें शेवटास नेऊन पुण्यास परत आले होते. त्यांनीं दादासाहेब यांस पत्र लिहिलें कीं, " गोदातीरीं कायगांव टोकें येथें आपण यावें, मीही तेथेंच आपल्या भेटीस येतों " या लिहिण्यावरून आपणास कांहीं तरी दगा होणार आहे असा संशय दादासाहेब यांस येऊन ते टोक्यास न जातां परभारें चांदवड परगण्यांत कुरडगांव येथें येऊन त्यानीं गोदातीरीं मुक्काम केला. (कुरडगांव विंचुरापासून साहा कोसांचे अंतरावर आहे.) हें वर्तमान रावसाहेब पेशवे यांस समजलें, तेव्हां त्यांनीं सखारामबापू यांचे मार्फत दादासाहेब यांचे मनांतील संशय दूर करून कुरडगांव येथें त्यांची भेट घेतली. नंतर उभयतां पेशवे तेथेंच कांहीं दिवस राहिले. त्या वेळेस सखारामबापू वगैरे मुत्सद्दी मंडळीही तेथेंच होती.

विठ्ठल शिवदेव यानीं उत्तरहिंदुस्थानांत दादासाहेब यांचें आज्ञेप्रमाणें सर्व बंदोबस्त केल्यावर ते तेथून तावडतोब निघून श्रावण

शुद्ध १३ शके १६८९ रोजीं विंचुरास येऊन दाखल झाले. त्यांची प्रकृति मार्गांतच फार बिघडली होती; परंतु कसें तरी घर जवळ करावें ह्मणून ते मजल दरमजल विंचुरास येऊन पोहोंचले. तेथेंही त्यांस आपल्या प्रकृतीचा भरंवसा वाटेना. सबब त्यांनीं आपले वडील चिरंजीव शिवाजी विठ्ठल यांस जवळ बोलावून पुढें कसें वर्तावें याविषयीं त्यांस उत्तम प्रकारें उपदेश केला. तो असाः—"सदोदित मालिकाचे सेवेंत तत्पर राहून कोणतेही प्रकारें नमकहरामीचें कृत्य करूं नये; आणि लढाईचे प्रसंगीं आपले मालिकाचे कार्यार्थ आपला जीव खर्चीं घालण्यापर्यंत मागें पुढें पाहूं नये." हा उपदेश सांगणें झाल्यानंतर त्यांनीं आपली सर्व दौलत त्यांचे स्वाधीन करून वर लिहिल्या प्रकारें तिची सरदारी संभाळावी असें त्यांस सांगितलें. नंतर त्यांनीं आपल्या पदरचे सर्व मंडळीस बोलावून आणून चिरंजीव शिवाजी विठ्ठल यांचे हात त्यांचे हातांत घालून त्यांस सांगितलें कीं, "आमचे पश्चात हेच मुख्य सरदारीचे मालिक आहेत; ह्यांचे आज्ञेंत तुह्मीं सर्वांनीं आणि आमचे कनिष्ट पुत्रांनीं वागावें."

"चिमणाजी खंडेराव दिवाण यानीं पेशव्यांकडील वकिलीचें काम संभाळून स्वारींत सव प्रकारची देखरेख करीत जावी."

"विठ्ठल त्रिंबक व नारो त्रिंबक सालकाढे यांनीं विंचूर मुक्कामीं राहून माहालचे बंदोबस्ताचें काम पाहात जावें."

"आबूराव विठ्ठल व बाबूराव विठ्ठल कोटमगांवकर यांनीं फौजेचा बंदोबस्त पूर्ववत् ठेवून कोणतेही समयीं अपयश न येईल असें वर्तावें."

"खंडूजी केंजळे यांनीं प्रपंचसंबधा व्यवस्था पाहावी आणि खरेदी घेतलेल्या वतनांच्या संबंधानें व्यवस्था ठेवून नवीन वतनें संपादन करावीं."

"सर्व मंडळींनीं शिवाजी विठ्ठल यांचे हुकमतींत राहून लक्ष्य-पूर्वक एकनिष्टेनें सरकारचाकरी करावी."

याप्रमाणें सर्वांस सांगून आपला कुलस्वामी नरहरि याजपुढें पडून नामस्मरण करीत असतां त्यांस श्रावण वद्य प्रतिपदेस देवाज्ञा झाली. ही गोष्ट शके १६८९ म्हणजे सन १७६७ इसवी सालीं घडली.

विठ्ठल शिवदेव यांस पांच पुत्र होते. पैकीं, वडील कुटुंब वाईजवळील केंजळगांव येथील कुळकर्ण्याची कन्या रखमाबाई यांचे चार पुत्र; त्यांचीं नांवें:—शिवाजी विठ्ठल पहिले, नरसिंगराव विठ्ठल दुसरे, मल्हारराव विठ्ठल तिसरे, बाजीराव विठ्ठल चवथे. रखमाबाई निवर्तल्यावर काल्पी येथें जें दुसरें लग्न त्यांनीं केलें, त्या कुटुंबाचें नांव यमुनाबाई असें होतें. यांचे पुत्र खंडेराव विठ्ठल; एकूण पांच पुत्र.

वडील पुत्र शिवाजीपंत बापू हे विठ्ठलराव असतां त्यांच्या बहुतेक स्वाऱ्यांत त्यांजबरोबर असत; व त्यांचें जाणें येणें पेशवे यांजकडे स्वतंत्रपणेंही होतें. विठ्ठलराव जिवंत असतांच शिवाजीपंत बापू यांनीं निजामापासून अणकई, राजदेर व इतर किल्ले लढाई करून घेतले. या कारणानें पेशव्यांची मर्जी त्यांजवर खुष होऊन त्यांनीं त्यांस पालखीची नेमणूक व खेरीज जाती करितां निराळी नेमणूक करून दिली होती. विठ्ठलराव स्वारीस जाऊन हे घरीं राहिले तर माहालासंबंधीं वगैरे कामें कारभारी हे त्यांस कळवून त्यांचे विचारें चालवीत असत. शिवाजीपंत बापू हे मातुश्रीचे उदरांत उत्पन्न झाल्यापासून विठ्ठल शिवदेव यांचा विशेष उत्कर्ष होत गेला, म्हणून त्यांची त्यांजवर फार प्रीति असे, व ते भाग्यवान् असें विठ्ठलराव समजत असत. शिवाजीपंत बापू हे स्वभावानें जरी धिमे व शांत होते, तरी युद्धकर्मांत मोठे शूर होते.

दुसरे पुत्र नरसिंगराव हेही शूर होते; परंतु स्वभावानें अ-

ति क्रूर व उतावळे असल्याकारणानें त्यांजवर विठ्ठलराव यांची प्रीति कमी होती. विठ्ठल शिवदेव हे स्वर्गवासी झाल्यावर पांच बंधूंमध्यें परस्पर वैमनस्य आल्याकारणानें पेशव्यांचे कारभारी सखाराम बापू यांनीं श्रीमंतांच्या आज्ञेवरून सर्व सरदारीचा अधिकार वडील बंधु शिवाजीपंत बापू यांस देऊन कनिष्ठ चार बंधूंस नेमणुकी ठरवून दिल्या. तत्रापिही नरसिंगराव विठ्ठल हे स्वभावानें क्रूर असल्यामुळें हरवक्त मोठे तंटे करूं लागले. सबब शिवाजीपंत बापू यानीं पेशव्यांचे आज्ञेवरून त्यांस कैद करून माळवाप्रांतीं आपले माहालांपैकीं आष्टे माहालांत त्यांस कुटुंबासुद्धां प्रतिबंधांत ठेविलें. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांचा तेथेंच देहांत झाला आणि त्यांचें कुटुंब त्यांजबरोबर सती गेलें.

तिसरे पुत्र मल्हारराव हे सुज्ञ व बहुतेक दरबारी कामांत हुषार असून बहुत सुरूप होते. दादासाहेब पेशवे पूर्वी ज्या वेळेस विंचुरास आले, त्या वेळेस त्यांनीं त्यांस सामोरे जाऊन खासगी वाड्यांत उतरून घेतले आणि मुत्सद्दी मंडळीसुद्धां सर्वांचा चांगला सत्कार करून त्या गोष्टीची खबर आपले वडील यांस वाफगांवास पोहोंचविली होती. नारोशंकर राजे बहादर यांस औरस पुत्र नसल्यामुळें त्यानीं मल्हारराव विठ्ठल यांस दत्तक घ्यावें असें मनांत आणून आपली इच्छा विठ्ठल शिवदेव यांस कळविली; परंतु त्यानीं ती गोष्ट कबूल केली नाहीं. मल्हारराव हे विठ्ठल शिवदेव यांचे मागून थोडकेच दिवसांनीं कैलासवासी झाले व त्यांची पत्नी पार्वतीबाई ही सन १८३७ इसवीपर्यंत गोदातीरीं सायखेडें येथें राहून मरण पावली. या बाईनें तीर्थयात्रा व दानधर्म बहुत केला.

चवथे पुत्र बाजीराव विठ्ठल यांस दुर्दैवेंकरून अल्पवयांतच ऐषआराम व स्त्रीसंभोग करण्याची इच्छा उत्पन्न झाल्यामुळें नषा करण्याचा छंद लागून तो वाढत वाढत शेवटीं चरष ओढण्यापर्यंत जाऊन पोहोंचला. तेणेंकरून पुढें त्यांचा मगज बिघडून